


# प्रीतिसंगम

www.pritisangam.com

सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर





वर्ष २९ वे | अंक ५३ | पाने ६ | सोमवार | दि. २३ जून २०२५ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५

# अमेरिकेचा इराणवर एअर स्ट्राईक

***नवी दिल्ली/वृत्तसंस्थाः-***

इराण इस्त्रायल युद्ध भडकलं असतानाच इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांनी एक मोठा निर्णय घेतला आहे. इस्त्रायलकडून हत्येचा धोका लक्षात घेऊन खामेनी यांनी आपले तीन उत्तराधिकारी निवडल्याचे समजते. अलीरेजा अराफी अली असगर हेजाजी, हासिम हुसैनी बुशहरी, अली अकबर वेलायती अशी त्यांची नावं आहेत. विशेष म्हणजे यात खामेनी यांचा मुलगा मुजतबा खामेनी यांचं नाव नाही. इस्त्रायलच्या हल्ल्यामुळे खामेनी यांची तीन दशकांपासूनची सत्ता धोक्यात आल्याचं मानलं जातंय. खामेनी सध्या एका सुरक्षित बंकरमध्ये लपल्याची माहिती आहे.



तर दुसरीकडे इस्त्रायलकडून सातत्याने इराणी लष्करातील बड्या अधिकाऱ्यांना ठार मारले जात आहे. नुकताच इस्त्रायलने इराणवर पुन्हा मोठा हल्ला केला. त्यात २०२३ मध्ये इस्त्रायलवर हमासनं केलेल्या हल्ल्याचा मास्टरमाईंड सईद इजादीला ठार केल्याचा दावा इस्त्रायलनं केला आहे. इस्त्रायलवर हल्ल्यासाठी इजादीनंच हमासला फंडिग केल्याचं आणि हत्यार पुरवल्याचं इस्त्रायलचं म्हणणं आहे. हल्ल्यात इराणच्या आणखी एका अणुशास्त्रज्ञालाही ठार केल्याचं इस्त्रायलनं सांगितले होते. १३ जूनपासून इस्त्रायलने ११ इराणी अणुशास्त्रज्ञांना ठार मारले. इस्त्रायल आणि इराणमधील सुरू असलेल्या संघर्षाचा आज ९ वा दिवस आहे.

इराण आणि इस्त्रायल यांच्यातील युद्धात आता अमेरिकेने उडी घेतली आहे. अमेरिकेच्या विमानांनी काहीवेळापूर्वीच इराणमधील तीन महत्त्वाच्या अणुकेंद्रांवर हल्ला केला. यामुळे मध्यपूर्वेत मोठ्या युद्धाला तोंड फुटण्याची शक्यता आहे. अमेरिकेनंतर आता रशियाने या युद्धात उडी घेतल्यास या युद्धाल जागतिक स्वरुप प्राप्त होईल. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्विट करुन इराणवरील हल्ल्याची माहिती दिली आहे. त्यानुसार अमेरिकेच्या लढाऊ विमानांनी फोर्डो,नातांझ,एसफहान या तीन आण्विक तळांवर हल्ले केले. अमेरिकेच्या हल्ल्यात इराणचा फोर्डो आण्विक तळ पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे. आमची विमानं हल्ला करुन सहीसलामत माघारी परतली आहेत. आता शांततेची वेळ आहे, इराणनं युद्ध थांबवावं, असे डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्विटमध्ये म्हटले आहे.

# माळेगाव कारखान्यासाठी ८८.४८% मतदान

***बारामती/प्रतिनिधीः-***

माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी आज पार पडलेल्या मतदान प्रक्रियेला शेतकरी सभासदांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सकाळी ७ वाजल्यापासून सुरू झालेल्या मतदानाने संपूर्ण परिसरात निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापवले होते. ग्रामीण भागातील महिलांपासून ते तरुण मतदारांपर्यंत सर्वच घटकांनी लोकशाहीच्या हक्काचा सक्रीय वापर करत मतपेट्यांपुढे हजेरी लावली.

या निवडणुकीत एकूण १९५४९ सभासदांपैकी १२८६२ पुरुष मतदारांनी व ४४३४ स्त्री मतदारांनी असे एकूण १७२९६ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला तर ब वर्ग मतदारसंघातील १०२ मतदारांपैकी ९९ पुरुष मतदारांनी व २ स्त्री मतदारांनी असे मिळून १०१ मतदारांनी आपला हक्क बजावला एकूण शेतकरी सभासदांची टक्केवारी ८८.४८% तर ब वर्ग मतदारांची टक्केवारी ९९.०२% इतके मतदान करण्यात आले हे मतदान कारखान्याच्या इतिहासातील

***मतदान शांत,पण मनात वादळ**
***मतदारांनी दाखवली लोकशाहीची ताकद**
***साखर कारखान्याची लढाई थेट मतपेटीत**
***माळेगावची सत्ता कोणाच्या बाजूने वळणार?**

यावर्षीच्या पंचवार्षिक निवडणुकीमधील उच्चांकी मतदान ठरले यासाठी ६७ मतदान केंद्रांवर व्यवस्था करण्यात आली होती. सर्व केंद्रांवर सकाळपासूनच मतदारांची गर्दी पाहायला मिळाली. काही ठिकाणी रांगांमध्ये थोडा वेळ लागला असला, तरी निवडणूक यंत्रणेच्या चोख नियोजनामुळे सर्व प्रक्रिया शांततेत पार पडली.

या निवडणुकीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिले आहे. कारण, माळेगाव साखर कारखाना हा बारामती तालुक्यातील केवळ आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचा नाही, तर राजकीय दृष्ट्या ही प्रभावी मानला जातो. गेल्या काही महिन्यांपासून निर्माण झालेली राजकीय घडामोडी, पक्षांतील अंतर्गत मतभेद, आणि विविध गटांचे मैदानात उतरणे यामुळे ही निवडणूक अधिकच रंगतदार ठरली आहे.

प्रचारकाळात विविध पॅनलांनी



सभासदांपर्यंत पोहोचण्यासाठी रात्रंदिवस परिश्रम घेतले. सोशल मीडियापासून ते गावोगावी होणाऱ्या छोट्या छोट्या बैठकींपर्यंत सर्व स्तरांवर मतदारांना आपापल्या बाजूने खेचण्याचा प्रयत्न झाला. प्रत्येक पॅनलने कारखान्याच्या भविष्यासंदर्भात आपले स्वप्न दाखवले, विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

या निवडणुकीचा निकाल केवळ एका कारखान्याच्या भारावर परिणाम करणारा नसून, तालुक्याच्या राजकीय भवितव्यासाठी दिशा देणारा ठरणार आहे . कोणता विचार, कोणता दृष्टिकोन आणि कोणते नेतृत्व सभासदांमध्ये प्रभावी ठरते, हे निकालातून स्पष्ट होणार आहे. त्यामुळे २४ जून रोजी होणाऱ्या मतमोजणीकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे.

लोकशाही प्रक्रियेवरचा विश्वास सहभाग आणि एकजुटीची भावना दाखवत माळेगावातील सभासदांनी आपला मताधिकार बजावला आता निकालाच्या निर्णायक क्षणाची वाट पाहणं सुरू आहे.

# सज्जनगड नजीक दरड कोसळली

***सातारा/प्रतिनिधीः-***

सातारा-सज्जनगड रस्त्यावर रविवारी दुपारी दरड कोसळली. दगड-मातीबरोबरच झाडाच्या फांद्या रस्त्यावर आल्याने या मार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. सुदैवाने या मार्गावर वाहतूक सुरू नसल्याने वित्त हानी झाली नाही.

या घटनेची माहिती मिळताच, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तातडीने दरड हटविण्याचे काम हाती घेण्यात आले. पावसाळा सुरू झाल्यापासून महाबळेश्वर, जावळी व सातारा तालुक्यात दरड कोसळण्याचे सत्र सुरू झाले आहे. काही दिवसांपूर्वी सज्जनगड जवळील बोरणे घाटात दरड कोसळली होती. अतीवृष्टीमुळे अशा घटना वाढू लागल्याने वाहनधारकांनी रात्रीच्या वेळी घाटरस्त्यातील प्रवास टाळावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने रविवारी दुपारनंतर तत्काळ यंत्रणा घटनास्थळी रवाना केली . अर्धा तासामध्ये दरड हटविण्यात आली आणि वाहतुकीचा मार्ग मोकळा केला . डोंगर परिसर लाल मातीचा असल्याने मुसळधार पावसाने डोंगरावरची माती निसटून रस्त्यावर येत आहे अशी माहिती बांधकाम विभागाच्या सूत्रांनी दिली.



## गाडीमध्ये ठेवलेल्या सॅकसह रोख रकमेची चोरी

***सातारा/प्रतिनिधीः-***

गाडीमध्ये ठेवलेल्या सॅकसह रोख रकमेची चोरी केल्याप्रकरणी अज्ञात चोरट्या विरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महाबळेश्वर मधील उच्चभ्रू हॉटेलमध्ये तरुणीची आत्महत्या

***महाबळेश्वर/प्रतिनिधीः-***

महाबळेश्वर शहरातील एस,टी स्टँड परिसरातील प्रसिद्ध हॉटेल श्रेयस येथे नागपूर येथिल प्रथम इन्स्टिट्यूट येथून प्रशिक्षण घेऊन परराज्यातील चार तरुणी हॉटेल मध्ये दहा दिवसांपूर्वी शिकाऊ कामगार म्हणून कामास आल्या होत्या. या मधील एक असलेली रागिणी कुमारी सिनिल साव वय १९ रा. सध्या महाबळेश्वर मूळ - मुशी मरी पो लखवार जिल्हा -घोसी जहानाबाद,बिहार या तरुणीने रूमच्या बाथरूमच्या छताच्या पत्र्यास असलेल्या लोखंडी अँगलला पांढऱ्या रंगाच्या ओढणीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे.रागिणी कुमारी ही आपल्या मैत्रिणीन समवेत हॉटेलच्या कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या खोली मध्ये राहत होती. घटनेच्या दिवशी रागिनीची ड्युटी संध्याकाळी लवकर संपल्यामुळे ती आपल्या रूमवर आली होती. इतर मैत्रिणी ड्युटीवर गेल्या होत्या त्या रात्री ११:३० वाजता आपली ड्युटी संपवून पुन्हा रूमच्या दिशेने आल्या परंतु एक तास दरवाजा ठोठावून देखील आतून कोणताही प्रतिसाद न आल्याने त्यांना संशय आला. याबाबतची माहिती त्यांनी हॉटेल मॅनेजर यांना दिली स्टाफ रूमचा आतून बंद असलेला दरवाजा कुणीही उघडत नसल्याचे पाहून सरते शेवटी दरवाजा तोडून रूम मध्ये प्रवेश केला असता रूम मध्ये कोणीही आढळून आले नाही. रूमचे बाथरूम देखील आतून बंद होते तो दरवाजा उघडून पाहिले असता रागिणी हिचा गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला.

हॉटेल व्यवस्थापनाने तात्काळ या घटनेची माहिती महाबळेश्वर पोलिसांना दिली असता महाबळेश्वर पोलिसांनी घटनास्थळावरून रागिनीच्या मृतदेहाचा पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला व शवविच्छेदनासाठी महाबळेश्वर ग्रामीण रुग्णालयामध्ये दाखल केला. परंतु या आत्महत्ये मागचे कारण अद्यापही गुलदस्त्यातच असून या अनुषंगाने महाबळेश्वर मधील बहुतांशी हॉटेल्स मध्ये काम करणारे जवळपास ९०% कामगार हे परप्रांतीय असून या कर्मचाऱ्यांची संपूर्ण माहिती व त्यांच्या भूतकाळाविषयी माहिती असणे किती गरजेचे आहे हे ह्या प्रकरणावरून समजते. या घटनेचा अधिक तपास पो. नी. बापूसाहेब सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली पो. हवा. संतोष शेलार करत आहेत.

## कार्यालय दर्शन..

सरकारी कार्यालयां
करावे लागे पर्यटन
नशीबाचे भोग भोगे
दुर्दैव करते उद्घाटन
काम एखादे निघता
सदृश्य साक्षातमरण
दुर्योग कसला आला
धरावे गर्दभाचे चरण
एक खिडकी योजना
मिथ्या हो नाम करण
जागो जागी भटकंती
थांबणारं कधी भ्रमण
निराकार चेहरे पहात
करत जा मार्ग क्रमण
अंगावरी खेकसे तरी
बनायचे साध्वीश्रमण
लाचेची मॉडर्न पध्दत
अद्ययावतहवे शिक्षण
देणार नाही चिरीमिरी
अति मुर्खपणा लक्षण
बलवत्तर असो नशीब
भेटेलं साहेब सुलक्षण
विचीत्र सवाल विचारु
दावूनकात अवलक्षण
कार्य साफल्य होताचं
सर्वांचे आभारप्रदर्शन
अपेक्षा मागणे एकचि
पुन्हा ना घडावे दर्शन

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# सडावाघापूरचा उलटा धबधबा पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी

## उंब्रज पोलिसांकडून बेशिस्त व हुल्लडबाजी करणाऱ्या वाहने चालकावर कारवाई


***उंब्रज/प्रतिनिधीः-***

सर्वत्र प्रसिद्ध असलेला पाटण तालुक्यातील सडावाघापूरचा उलटा धबधबा सध्या पावसामुळे ओसंडून वाहू लागला आहे. हा उलटा धबधबा पाहण्यासाठी राज्यभरातील विविध जिल्ह्यातून मोठ्या संख्येने पर्यटक सडावाघापूरला दाखल होऊ लागले आहेत. दरम्यान या पर्यटकांमध्ये - हुल्लडबाजी करणाऱ्या व वाहतुकीची शिस्त न पाळणाऱ्या तरुणाईचा मोठा सहभाग आहे.उंब्रज पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनी रविंद्र भोरे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सागर खबाले,,कचरे, पोलीस नाईक रोहित थोरवे पोलीस कॉन्स्टेबल संजय मासाळ, , पाटील , प्रफुल पोतेकर



यांनी उंब्रज पोलीस ठाणे अंकित तारळे दूरक्षेत्र हद्दीत सडावाघापुर रोड वजरोशी येथे नाकाबंदी करून ३१ चारचाकी व ५३ दुचाकी वाहने तपासून ३८ वाहनांवर मोटर वाहन कायद्यांतर्गत कारवाई करून २८,५०० रुपयांची दंडात्मक कारवाई केली आहे.

सडा वाघापूर येथे जाणाऱ्या सर्व पर्यटकांनी वाहतुकीचे नियम पाळून इतर पर्यटकांना त्रास होणार नाही याची खबरदारी घेणेबाबत उंब्रज पोलिसांकडून आवाहन करण्यात आलेले आहे.




***सासवड/प्रतिनिधीः-***

आम्हा ध्यास पंढरीचा अपार.. अवघड वाटही होते लीलया पार..! विठ्ठलाच्या नामाचा अखंड जयघोष करीत व भक्तीचे भारावलेपण घेऊन पंढरीच्या वाटेवर असलेल्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींच्या पालखी सोहळ्याने लाखो वैष्णवांचा साथीने ज्येष्ठ कृष्ण योगिनी एकादशी मंगळवारी दिवे घाटातील वारीच्या वाटेवरील सर्वात कठीण नागमोडी वळणाचा टप्पा पार केला. सुमारे दोन तास घाटातील वाटचाल पूर्ण करून सोहळा संध्याकाळी सासवड मुक्कामी दाखल झाला.

डोक्यावर तुळशी वृंदावन, खांद्यावर भगव्या पताका, गळ्यात टाळ, मृदुंग, मुखाने ज्ञानोबा तुकाराम च्या नावाचा जयघोष करीत घाट पार करीत होते. त्यात वरुणराजाने चांगलीच भर घातली. सायंकाळी साडेचार वाजता संत ज्ञानेश्वर पालखी सोहळयाचे वैष्णवासमवेत दिवेघाटातून पुरंदर तालुक्यात आगमन झाले. माऊलींच्या दर्शनासाठी आसुसलेल्या लाखो भाविकांनी टाळ्यांच्या कडकडाट आणि पुष्पवृष्टी करीत आनंद व्यक्त करीत मोठ्या उत्साहात पालखी सोहळ्याचे स्वागत केले.

माउलींचा पालखी सोहळा पुण्यातून मार्गस्थ झाल्यानंतर दुपारी २ वा. वडकीनाला येथे विसाव्यासाठी थांबला. यावेळी वडकी ग्रामपंचायत व अनेक सार्वजनिक मंडळांनी अन्नदान केले. त्यानंतर दुपारी ३.३० वा. सर्वात अवघड टप्पा समजल्या जाणाऱ्या दिवेघाटातील वाटेने माऊलींच्या रथाचा प्रवास सुरू झाला. रथाला पाच बैलजोड्या जुंपण्यात आल्या होत्या. वातावरण ढगाळ स्वरूपाचे,जोरदार वाहता वारा व हवेत काहीसा थंडावा असल्याने उन्हाचा त्रास झाला नाही. मोठय़ा अंतराचा हा टप्पा चढताना न थकता दिंडीतील वारकरी निरनिराळी पदे, अभंग, भारुडे,गौळणी म्हणताना दिसत होते. वारकऱ्यांमध्ये एक वेगळेच चैतन्य संचारले होते. संत ज्ञानेश्वर पालखी तळावर पादुकांचे आगमन झाल्यावर सामुहिक आरती होवून दोन दिवसांच्या मुक्कामासाठी माऊलींचा सोहळा विसावला.






# संपादकीय

## हिंदी सक्तीचा वाद

महाराष्ट्रात त्रिभाषा सूत्रावरून नेत्यांमध्ये वाद – विवाद सुरू आहेत. त्रिभाषेतील हिंदी भाषेच्या अनिवार्यतेला मराठी जनतेच्या विरोधानंतर दोन महिन्यांनी राज्य सरकार नरमले आहे. अनिवार्यतेच्या जागी सर्वसाधारणपणे या शब्दाचा राज्य सरकारने पर्याय ठेवला आहे. या दुरुस्तीनंतर तिसऱ्या भाषेच्या निवडीबाबत अन् ती शिकवण्यासाठीची सुविधा उपलब्ध करण्याबाबत राज्य सरकारने टाकलेल्या अटी हिंदी भाषेला अपरिहार्य करण्याच्या असल्याची टीका शिक्षण तज्ज्ञांकडून होत आहे. त्रिभाषेच्या सूत्रावरील राज्यातील मराठी जनतेचा रोष सोशल मीडिया आणि प्रत्यक्ष निदर्शनांमधून व्यक्त होत असताना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा दाखला देत, राज्याने हिंदी भाषा का अनिवार्य केली होती याचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न करून पाहिला. महाराष्ट्रात हिन्दी भाषा अनिवार्य करण्यात राज्य सरकारचा काही डाव आहे का, अशी शंका अजूनही मराठी जणांना येत आहे. हिंदीसाठी राज्य सरकार कुणाच्या इशार्यावरून खटपट करीत आहे, असा सवाल मराठी जनतेतून व्यक्त होत आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरणात हिंदी भाषेचा आग्रह धरण्यात आल्याचे दिसत नसताना राज्य सरकारला हिंदी भाषा अनिवार्य करणायचे वेध का लागले आहेत ? केंद्र सरकारचे राष्ट्रीय शिक्षण धोरण महाराष्ट्रात लागू करण्यासाठी राज्य सरकारने दि. १६ एप्रिल २०२५ रोजी शासन निर्णय जारी केला. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने नवीन अभ्यासक्रम व पाठ्यक्रमाची अंमलबजावणी राज्यात २०२५ – २६ पासून टप्प्या-टप्प्याने करण्यासाठी हा शासन निर्णय असल्याचे महाराष्ट्राच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने म्हटले आहे. याच शासन निर्णयातील हिंदी भाषेसंदर्भातील उल्लेख पहिल्यांदा वादाचे कारण ठरले होते. तो उल्लेख असा होता की, सद्यस्थितीत मराठी व इंग्रजी माध्यमांच्या सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत केवळ दोन भाषा अभ्यासल्या जात आहेत. उर्वरित माध्यमांच्या शाळांमध्ये त्रिभाषा सूत्रानुसार, मराठी व इंग्रजी भाषा बंधनकारक असल्यामुळे माध्यम भाषा, मराठी व इंग्रजी अशा तीन भाषा अभ्यासल्या जात आहेत. राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण २०२४ नुसार यापुढे इयत्ता पहिली ते पाचवीसाठी मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये हिंदी ही तृतीय भाषा म्हणून अनिवार्य असेल. अन्य माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते पाचवीसाठी माध्यम भाषा, मराठी व इंग्रजी अशा तीन भाषा अभ्यासल्या जातील. इयत्ता सहावी ते दहावीसाठी भाषा धोरण हे राज्य अभ्यासक्रम आराखडा–शालेय शिक्षण प्रमाणेच असेल.

दि. १६ एप्रिल २०२५ च्या या शासन निर्णयावरूनच महाराष्ट्रात पहिल्यांदा वादाला सुरुवात झाली. कारण या शासन निर्णयात हिंदी भाषा अनिवार्य असल्याचा उल्लेख करण्यात आला होता. या वादावेळी, राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले होते की, जे नवीन शिक्षण धोरण आपण लागू करतो आहोत. त्यामुळे ही काही नवीन अधिसूचना नाही. शिक्षण धोरणात आपला प्रयत्न असा आहे की, सगळ्यांना मराठीही आली पाहिजे आणि त्यासोबत देशाची भाषाही आली पाहिजे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने विचार केला की, आपल्या देशात एक संपर्क भाषा असायला पाहिजे. त्याच दृष्टीने प्रयत्न केला गेला आहे. याचा अर्थ महाराष्ट्रात केंद्र सरकारच्या इशार्याने हिंदी शिकावेच लागेल, असा ध्वन्यार्थ या अधिसूचनेतून व्यक्त होत आहे. त्यानंतर गेल्या दोन महिन्यात हिंदी अनिवार्यतेचा हा वाद सुरू राहिला. मग शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांना केविलवाणे स्पष्टीकरण द्यावे लागले की, हिंदी अनिवार्य केली जाणार नाही. मात्र, हे कित्येक दिवस तोंडीच आश्वासन राहिल. परंतु तोंडी आश्वासन ठेवणायचे कारणच काय ? त्यात स्पष्टता नको का ?

राज्य सरकारने सुधारित शासन निर्णय जारी केला. यात हिंदी भाषेसंबंधी अनिवार्य काढून त्या जागी सर्वसाधारणपणे हा शब्द लिहिला. मात्र, त्याचवेळी तिसऱ्या भाषेच्या निवडीबाबत काही अटी सुद्धा सांगितल्या. या अटी अशा की, हिंदी या तृतीय भाषेऐवजी इतर भारतीय भाषा शिकण्याची इच्छा असल्यास मान्यता देण्यात येईल. मात्र, ही भाषा शिकण्याची इच्छा असलेल्यांची संख्या किमान २० असणे आवश्यक आहे. तरच शिक्षक उपलब्ध करून दिला जाईल, अन्यथा ऑनलाईन शिकवली जाईल. सुधारीत शासन निर्णय गोंधळात टाकणारा आहे. म्हणजे विद्यार्थ्यांना हिंदी शिकण्याशिवाय पर्याय नाही, असेच राज्य सरकारला नमूद करायचे आहे असे वाटते. थोडक्यात मराठी भाषेचे महत्व कमी व्हावे आणि भवितव्यात हिंदी भाषिकांचे प्राबल्य वाढावे यासाठी राज्य सरकारचा केंद्र सरकार पुरस्कृत खटाटोप सुरू आहे, असेच दिसते. यासंदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही आक्षेप घेतला आहे.

त्यानंतर आळंदीत वारीसंदर्भातील कार्यक्रमाला उपस्थित असताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधताना म्हटले की, कुठलीही तिसरी भारतीय भाषा तुम्हाला शिकता येईल. नवीन शैक्षणिक धोरणात तीन भाषेचे सूत्र केले गेले आहे. त्यात मातृभाषा अनिवार्य आहे. त्याच्या व्यतिरिक्त दोन भाषा, त्यातली एक भारतीय भाषा असली पाहिजे. स्वाभाविकपणे आपल्याकडे लोक इंग्रजी स्वीकारतात. त्यात तिसरी भाषा स्वाभाविकपणे आपण हिंदी म्हटले होते, कारण हिंदीचे शिक्षक मोठ्या प्रमाणात उपलब्ध होतात. पण आता आपण ती अनिवार्यता काढून टाकली आहे.

राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनीही सुधारित शासन निर्णय जारी केल्यानंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत, तिसरी भाषा हिंदी अनिवार्य नसून भाषा निवडण्याचे स्वातंत्र्य दिल्याचे म्हटले आहे. मात्र, त्रिभाषा सूत्रावर किंवा पहिलीपासून त्रिभाषा सूत्रावर त्यांनी स्पष्टपणे भूमिका मांडली नाही. म्हणजेच, महाराष्ट्रात त्रिभाषा सूत्र कायम असेल. नवीन शिक्षण धोरणात बहुभाषावाद आणि भाषेची शक्ती या मथळ्याखाली शिक्षणातील भाषेसंदर्भाच्या सूचना करण्यात आल्या आहेत. यात म्हटले आहे की, जिथे शक्य आहे तिथे, किमान ५ व्या इयत्तेपर्यंत आणि शक्यतोवर ८ व्या इयत्तेपर्यंत शिक्षणाचे माध्यम घरातील भाषा, मातृभाषा, स्थानिक भाषा किंवा प्रादेशिक भाषा असले पाहिजे. राष्ट्रीय शिक्षण धोरण आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा या दोन्हींमध्ये हिंदी भाषेच्या अनिवार्याचा उल्लेख नसेल, तर तो महाराष्ट्राच्या धोरणात कसा आला ? हिंदी भाषिकांची संख्या महाराष्ट्रात वाढत असताना केंद्र सरकारने महाराष्ट्रातीळ शिक्षणात हिंदी सक्तीची केली आहे. राज्य सरकारची सूचना स्पष्ट नसली तरी या अस्पष्टतेमागे हिंदी भाषेला महत्व देण्याचे सूत्र राज्य सरकार ठरवत आहे. राज्यात मराठी भाषेला ग्लानी आणण्याचे कार्य राज्य सरकार केंद्र सरकारमधील हिंदी भाषिक नेत्यांच्या इशार्यावरून करीत आहे, असे वाटते.

# ग्राहक, हक्क आणि जागृती

सर्वसामान्य माणूस दिवसभरात आपल्या कुटुंबासाठी लागणार्या गरजेच्या वस्तु बाजारातून घेऊन येतो. सकाळपासून प्रत्येकाला काही ना काही कारणाने दूध, भाजीपाला आणि धान्य व इतर वस्तु दुकानांतून खरेदी कराव्या लागतात. परंतु आपण खरेदी केलेल्या वस्तूंचे मोजमाप योग्य आहे का, याचे मूल्यांकन सर्वत्र होतेच असे नाही. दुकानदार ज्या वजनकाट्यावर माल गिर्हाईकाला देतो, तो वजनकाटा प्रमाणित आहे का, हे कुणाला माहीत नसते. किंवा आपण त्याची गांभीर्याने दखल घेत नाही. विक्रेता योग्य ते मोजमाप करून ग्राहकाला वस्तु विकत देतो, असा आपल्याकडे समज (खरे तर गैरसमज) आहे. अनेक ठिकाणी वजन मापे पडताळणी करून घेतलेली नाहीत, असेच दिसून आले आहे. वजनकाटे तपासणी आणि मुद्रांकन करणे दरवर्षी बंधनकारक असले तरी त्याकडे अनेक दुकानदारांचे दुर्लक्ष होते. राज्य शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग आणि वैध मापनशास्त्र यंत्रणेमार्फत करण्यात आलेल्या तपासणीत ९९१ व्यापाऱ्यांवर नियमभंगाचे खटले दाखल करण्यात आले आहेत. या व्यापाऱ्यांनी वापरात असलेल्या इलेक्ट्रॉनिक वजन काट्यांचे मुद्रांकन व पडताळणी केलेली नाही, अशी माहिती वैध मापनशास्त्र विभागाने दिली आहे. विभागाने काही व्यापाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली असली, तरी तपासणीसाठी अधिकारी- कर्मचारी वेळेवर येत नाहीत, असा आरोप अनेक व्यापाऱ्यांकडून केला जात आहे. यात तथ्य आहे का ? अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग आणि वैध मापनशास्त्र यंत्रणेच्या कूर्मगतीचा फटका दुकानदार व व्यापार्यांना बसत तर नाही ना, असा सवाल व्यक्त होत आहे.



**अशोक सुतार**

**कृष्णाकाठ...**

नाशिक ग्रामीण, अहिल्यानगर, धुळे व नंदुरबार, जळगाव या विभागांत २०२४-२५ वर्षांमध्ये ९९१ व्यापाऱ्यांवर नियमभंगाचे खटले दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणी एकूण १२ कोटी २६ लाख ७० हजार २२४ रुपये दंड व्यापार्यांना लागू झाला आहे. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग आणि वैध मापनशास्त्र यंत्रणेमार्फत सदर कारवाई करण्यात आली आहे. या व्यापाऱ्यांनी वापरात असलेल्या इलेक्ट्रॉनिक वजन काट्यांचे मुद्रांकन व पडताळणी केलेली नाही, अशी माहिती वैध मापनशास्त्र विभागाने दिली आहे. वजन काटयांचे मुद्रांकन व पडताळणी नियमांनुसार दरवर्षी होणे अपेक्षित असते. ही माहिती उत्तर महाराष्ट्रातील आहे. महाराष्ट्रात अजून मुंबई, उपनगरे, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, पूर्व महाराष्ट्र येथील आकडेवारी उपलब्ध नसली तरी वजन काट्यांचे मुद्रांकन व पडताळणी यांबाबत उर्वरीत महाराष्ट्रात अनेक व्यापारी नियमबाह्य कृतयू करीत आहेत, हे आढळू शकते. त्यामुळे ग्राहक संरक्षणाच्या दृष्टीने अद्यापही मोठ्या प्रमाणात सुधारणा आवश्यक आहेत. सरकारी नियमांचे पालन करून वजनकाट्यांची वेळेवर पडताळणी न केल्यास, ग्राहकांचे आर्थिक शोषण होते. ते थांबविणार कसे ? हा प्रश्न उद्भवतो. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी अधिक दक्षता घेत कठोर कारवाई करणे आवश्यक आहे.

वजन मापांचे मुद्रांकन व पडताळणी नसल्यास ग्राहकांची फसवणूक होते. ही फसवणूक थांबविण्यासाठी राज्य सरकारने पॅकबंद वस्तूंमधील वजन, किंमत व एक्सपायरीबाबत दक्ष राहिले पाहिजे असे वाटते. कारण ग्राहकांची फसवणूक होणे गंभीर बाब आहे. एक लिटरऐवजी कमी वजनाचे पाऊच तेच दर लावून विकले जातात. वजन माप निरीक्षकांनी बाजारातील पॅकिंगवर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. ग्राहकांनीही सतर्क राहून प्रत्येक खरेदीवेळी वजन, माप, एमआरपी व अंतिम मुदत तपासावी. अशा फसवणुकीविरोधात कायदेशीर पावले उचलणे अत्यावश्यक आहे. ग्राहकराजा सहसा विक्रेत्यांवर विश्वास ठेवून वस्तु खरेदी करत असल्यामुळे अनेक व्यापार्यांकडून ग्राहकांची फसवणूक होत असण्याची शक्यता बळावत आहे.

सातारा जिल्ह्यातील ग्राहकांनी दुकानदार आणि व्यापार्यांकडून जीवनावश्यक वस्तु विकत घेताना वजन मापे यांबाबत दक्ष असावे. तसेच काही शंका वाटल्यास राज्य सरकारच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग आणि वैध मापनशास्त्र विभागाला संपर्क साधावा. ग्राहक संरक्षण कायदा जाणून घेणे, त्याबाबत सक्रीय असणे महत्वाचे आहे. तसेच अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग आणि वैध मापनशास्त्र यंत्रणेने वजन मापे व मुद्रांकन याबाबत सर्व विभागांत तपासणी करणे गरजेचे वाटते. त्यामुळेच ग्राहक हित साधले जाईल. ग्राहकांनी आपल्या हक्कांबाबत जागृती दाखवणे गरजेचे वाटते.

# शाळेची पटसंख्या वाढविणे फक्त शिक्षकांची जबाबदारी ?

महाराष्ट्रात सध्या जिल्हा परिषद शाळांमध्ये पटसंख्या कमी असलेल्या शाळेतील अनेक शिक्षकांवर निलंबनाची कार्यवाही करण्यात आली. या कार्यवाही विषयी एक नागरिक म्हणून खुप प्रश्न निर्माण डोक्यात येतात. येथे मी शिक्षकांची बाजू अजिबात मांडत नाही फक्त न्यायीक पद्धतीने व्यवस्थेचा विचार करतो. अपवादात्मक शिक्षक वगळता अनेक शिक्षक सामाजिक व शैक्षणिक कार्यापासून खुप दुर आहेत. पगार, पत्नी आणि परिवारात ते मग्न आहेत. शिक्षणाची गुणवत्ता व शिक्षणातील तर्कवाद कमी व्हायला शिक्षक जबाबदार आहेत हे कोणीही नाकारू शकत नाही. गुलामीच्या बेड्या तोडून मानवी स्वातंत्र्य व विज्ञानवादातुन मानसाची प्रगती हे ध्येय घेऊन महात्मा फुले व सावित्रीमाई फुले यांनी शिक्षण सुरू करून समाजात क्रांती करून जागृती केली, शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे आणि जो प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही असे मत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे असताना किती शिक्षकांची विद्यार्थी विज्ञाननिष्ठ, तर्कवादी, जागृत व अन्याया विरूद्ध आवाज उठवणारे आहेत? याची समिक्षा शिक्षक करतील का? शिक्षकांविषयी अनेक प्रश्न व शंका डोक्यात आहेत च तरीही पटसंख्या कमी झाली म्हणून शिक्षकांवर निलंबणाची कार्यवाही केली हा शिक्षकांवर झालेला अन्याय आहे. अन्याया विरोधी जो बोलतो तोच खरा सुशिक्षित आहे. जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या कमी का झाली? याला कारणीभूत फक्त शिक्षकच आहेत का? यावर विचार विनीमय होणे आवश्यक आहे. जेही लोक कारणीभूत आहेत त्या सर्वांवर कारवाई होणे गरजेचे आहे. चला आपण विचार करू या जिल्हा परिषद शाळेची विद्यार्थी संख्या कमी का झाली याचे एकमेव कारण म्हणजे खाजगीकरणाच्या नावाखाली खाजगी शाळांना मान्यता देऊन शिक्षणाचा व्यापर करणे. खाजगी शाळा सुरू झाल्या लाखों रुपये लोक फि भरून मुलांना शैक्षणिक कमकुवत करत आहेत ते फक्त खोटे स्टेटस टिकण्यासाठी. श्रीमंत व नोकरदार व्यक्तींच्या लोकांनी आपली मुलं खाजगी शाळेत टाकले म्हणून सर्वसामान्य लोकांनी कर्ज काढून खोटी प्रतिष्ठा जपण्यासाठी व आपणही गरीब नाही हे दाखवण्यासाठी आपली मुलं खाजगी शाळेत टाकली. खाजगी शाळेत पैसे भरून मुलांना टाकणारे लोक सुशिक्षित आहेत का तर मुळीच नाही. ते सुशिक्षित आणि हुशार या दोन्ही प्रवर्गात न येता ते खोटी प्रतिष्ठा जपणाऱ्या बेगडी व मानसिक गुलाम प्रवर्गात मोडतात. याचे कारणही तसेच आहे शेतकऱ्यांना कडून भाजीपाला घेतांना भाव करणारे, एकही रुपया गोरगरिबांना न देणारे, लोकांना व्याजाने पैसे देणारे व वरतोंड करून हक्क अधिकाराच्या बाता करणाऱ्यांना प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे व मोफत आहे हे कळत नसेल आणि मोफतच्या शिक्षणासाठी वर्षाला लाखों रुपये खर्च करणाऱ्या लोकांना सुशिक्षित व हुशार कसं म्हणायचं? खाजगी शाळांवर नियंत्रण हाच खुप मोठा उपाय आहे जिल्हा परिषद शाळेतील पटसंख्या वाढविण्यासाठी. दुसरी गोष्ट म्हणजे एकदा निवडून आलेल्या आमदार खासदारांचे एका वर्षाच्या आत मोठ मोठे प्रशस्त बंगले, हॉटेल, बँका, कंपन्या, भुखंड आणि बरेच काही महागड्या वस्तुची कमाई होते. परंतु पंधरा विस वर्षे आमदार खासदार राहीलेला एक तरी नेता छाती ठोक पणे सांगु शकतो का माझ्या मतदार संघातील जिल्हापरिषद शाळेची इमारत प्रशस्त, स्वच्छ व आनंददायी आहे. जिल्हा परिषद शाळेच्या इमारती आजही बहुतांश स्वातंत्र्य पुर्व काळातील आहेत. त्याची रंगरंगोटी करण्यासाठी सरकार कडे पैसे नसावे? राज्यात बिअर पिणाऱ्यांची संख्या वाढविण्यासाठी समिती गठीत केली जाते उत्पादन शुल्क कमी केले जाते तर शाळेतील पटसंख्या वाढविण्यासाठी शासनाने समिती गठीत केल्याचे कुणाला माहिती आहे का? जिल्हा परिषद शिक्षकांना शिकवण्याचे काम कमी आणि इतरकामे जास्त दिली जातात परंतु विद्यार्थांची संख्या वाढविण्यासाठी नियोजन करण्याचे काम दिले जात नाही. जिल्हा परिषद शाळेच्या पाच किलोमीटर पर्यंत तरी खाजगी शाळेची परवानगी नाकारली तरीही जिल्हा परिषद शाळेला सोन्याचे दिवस येतील. शाळेतील पटसंख्या कमी होणे ही चिंतेची बाब आहेच हे कोणीही नाकारू शकत नाही पण शिक्षकांचे निलंबन हा योग्य उपाय आहे का? बरं पटसंख्ये सारख्याच अनेक गंभीर समस्या आपल्या समोर आहेत जसे अनेक ठिकाणी खड्यात रस्ते आहेत, जलजिवन मिशन योजनेचे कामही झाले नाहीत बिलही निघालेले आहेत, विमानतळ, रेल्वे, पुतळे, पुल उद्घाटन झाल्यानंतर काहीच दिवसात कोसळले, हजारो करोडो रुपयांचा चुराडा करून निकृष्ठ दर्जाचे काम केले गेले किती गंभीर आहे मग त्या मतदारसंघातील आमदार खासदार, संबंधित इंजिनिअर, मंजूर करणारे अधिकारी यांच्या वर कारवाई कधी होणार? ब्रिटिश कालीन पुल, रस्ते, इमारती आजही मजबूत आहेत पण आपल्या सरकारने बांधलेले रस्ते, पुल, पुतळे वाऱ्या व पावसाने पडतात तर किती जबाबदार लोकांचे निलंबन केले? मग शिक्षकांवरच कारवाई का? खाजगी शिक्षण संस्था बहुतांश राजकीय नेते व त्यांचे नातेवाईक यांच्या च आहेत म्हणजे राजकीय लोकांच्या हितासाठी सर्व सामान्य लोकांचा घात करणे यालाच पारदर्शक व इमानदार सरकार म्हणायचे का? फक्त शिक्षकांवर कारवाई आणि इतरांना सुट यालाच न्याय म्हणायचे का? शिक्षकांचे निलंबन झाले असताना शिक्षकांनी गप्प राहणे याला सुशिक्षित म्हणायचे का? आज काही शिक्षक निलंबित झाले उद्या कोणावरही वेळ येऊ शकते परंतु याचे गांभीर्य किती लोकांना आहे? जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या कशी वाढेल या साठी ज्या गावात पटसंख्या कमी आहे तिथे जाऊन सर्वसामान्य लोकांना जरी विचारले आणि तसे उपाय केले तर पटसंख्या वाढू शकते. मुळात वर्ग सात शिक्षक चार, वर्ग चार शिक्षक दोन असे नियोजन आणि त्यातही निलंबन असे केले तर संख्या कशी वाढेल? पटसंख्या वाढविण्यासाठी सोपे उपाय आहेत. परंतू ते उपाय सोडून शिक्षकांचे निलंबन करणे म्हणजे जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थी व पालकांचे खच्चीकरण करणे होय. शाळेची इमारत जुनी व रंगरंगोटी नाही म्हणून कोण जबाबदारी स्विकारणार? शाळेमध्ये पुरेसे शिक्षक नाही म्हणून कोण जबाबदारी स्विकारणार? प्रत्येक ऑफिस मध्ये भ्रष्टाचार आहे कोणाला निलंबित करणार? लोकांचे काम वेळेवर होत नाहीत कोणाला निलंबित करणार? पोलीस, तलाठी, ग्रामसेवक सारखे लोक करोडो रुपयांचे गबाड गोळा करतात कोणाचे निलंबन करणार? अनेक नोकरदार लोक दिवसभर कामाच्या ठिकाणी बसतच नाहीत त्यांच्या वर काय कारवाई होणार? गुन्हेगारी वाढली म्हणून पोलीस निलंबित होत नाहीत, सर्वसामान्य लोकांना पैसे न देता योजनेचे घरकुल मिळत नाहीत तेव्हा मात्र कोणीही निलंबित केले जात नाही. खाजगीकरण आणून सर्वात अगोदर शिक्षणावर घाव घातला गेला तेव्हा एकही शिक्षक बोलला नाही. आता शिक्षण राहिले बाजूला शिक्षकावरच घाव घालत आहेत. तेव्हाही शिक्षक पेटून उठून स्वतः चे भविष्य वाचवू शकत नसतील तर ते शिक्षक विद्यार्थ्यांचे भविष्य काय घडवणार? पटसंख्येचे कारण दाखवून शिक्षकांना घरी बसवले जात असेल आणि शिक्षक गप्प असतील तर याचा अर्थ पटसंख्या कमी व्हायला शिक्षकच जबाबदार आहेत हे शिक्षकांना मान्य आहे आणि निलंबनाची कारवाई योग्यच आहे हे सिद्ध होते. शिक्षकांनी जागृत होऊन आवाज उठवणे अत्यंत आवश्यक आहे. पटसंख्या कमी आहे म्हणून शिक्षकावर ठपका ठेऊन घरी बसवणे चुकीचे आहेच. शिक्षक दर्जेदार शिक्षण देत नाहीत, शिक्षक वेळेवर शाळेत येत नाहीत, शिक्षक धर्मनिरपेक्ष राहत नाहीत, शिक्षक अंधविश्वास व पाखंडाला चालना देऊन विद्यार्थ्यांना तर्क, सत्य व विज्ञान यापासून दुर ठेवतात या कारणांमुळे कमी केले तर कोणताही प्रश्न उपस्थित होणार नाही. पण शिक्षकांना पटसंख्येचे कारण दाखवून निलंबित केले तर हाच नियम वेगवेगळ्या विभागात लागु होऊन त्या विभागातील कामाची संख्या व वेग कमी आहे म्हणून कर्मचाऱ्यांना निलंबित केले तर ऐंशीटक्के पेक्षा जास्त शासकीय कार्यालये खाली होतील. सरकारने कोणतेही पाऊल उचलतांना न्यायीक भूमिका घ्यायला पाहिजे सुड भावना मनात ठेवून शिक्षणावर घाव घालु नये एवढीच अपेक्षा.



**विनोद सदावर्ते**
**आरेगांव**



# जातीवाचक शिवीगाळ आणि खंडणी प्रकरणी परस्परविरोधी गुन्हे दाखल

***सातारा/प्रतिनिधी:***

जातीवाचक शिवीगाळ आणि खंडणी प्रकरणी सातारा शहर पोलीस ठाण्यात परस्पर विरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २१ मे रोजी सकाळी ११ ते ११:३० वाजण्याच्या दरम्यान राजाराम रघुनाथ कुचेकर रा. अमरलक्ष्मी बस स्टॉप शेजारी, देगाव रोड, कोडोली, सातारा यांनी आशिष भोसले रा. सदर बाजार, सातारा यांना पगाराचे पैसे मागितले असता भोसले यांनी कुचेकर यांना जातीवाचक शिवीगाळ केली. याबाबत सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास उपविभागीय पोलीस अधिकारी राजीव नवले करीत आहेत.

दरम्यान आशिष मधुकर भोसले यांनी राजाराम रघुनाथ कुचेकर यांनी वीस लाख रुपये खंडणीची मागणी केल्याची फिर्याद सातारा शहर पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार मेचकर करीत आहेत.

# श्रीमंतापेक्षा गरीबात मानवता अधिक असते...

श्रीमंताची आणि गरीबाची तुलना करून माणुसकी कोणात जास्त आहे? हे जर पाहिले तर आपल्याला असे दिसून येईल की, श्रीमंतापेक्षा गरीब माणसात माणुसकी जास्त पाहायला मिळते. गोरगरिबांना मदत करण्यात, दुःखी व पीडितांना मायेचा आधार देण्यात, सामाजिक व धार्मिक कार्यात धावून जाण्यात आणि दारावर आलेल्या भिक्षूंना दानधर्म करण्यात श्रीमंतापेक्षा गरीब म्हटले जाणारे लोक आघाडीवर असतात. त्यांना माणुसकीच्या नात्याने इतरांना मदत करणे आवडते. माणुसकीचे काही गुणधर्म त्यांच्यात ठासून भरलेले असतात. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागातील लोकांमध्ये, विशेष करून गरिबांमध्ये ही मानवता अधिक प्रमाणात पाहायला मिळते. पण श्रीमंतात माणुसकीचे कोणतेच गुणधर्म आढळत नाहीत. पैशापुढे व संपत्तीपुढे त्यांच्यातील माणुसकी रसातळाला गेलेली असते. म्हणून त्यांच्यात कसलाच माणुसकीचा लवलेश आढळत नसतो. आपल्या श्रीमंतीचे प्रदर्शन करणे,आपले राहणीमान व आपला पोशाख तसेच आपल्या बोटातील व गळ्यातील सोनेचांदी इतरांना रुबाबात दाखवण्यात हे लोक फार पुढे असतात. ते जाईल तिथे आपल्या श्रीमंतीचा मोठेपणा मिरवतात. श्रीमंताच्या घरी आलेल्या पाहुण्यांची म्हणावी तेवढी सोय कधीच होत नाही. ते आलेल्या पाहुण्यांना साधा नमस्कार सुद्धा घालत नाहीत. नुसता चहापान करून काढून द्यायचे बघतात. त्यांना आपुलकीने दोन घास जेवण्याचा देखील आग्रह करत नाहीत. आणि जरीही जेवायला केले तर भरपेट खाऊ घालत नाहीत. पाहुण्यांना अर्ध्या पोटाने उठावे लागते. त्यांना आलेले पाहुणे बोज वाटायला लागते. म्हणून ते पाहुण्यांना लवकर काढून देण्याचे बघतात. दोन-तीन दिवस राहणे तर सोडाच, त्यांना एक दिवस राहणे सुद्धा जड जाते. पण याउलट गरिबांच्या घरी आलेल्या पाहुण्यांची यथोचित सोय होते. आलेल्या पाहुण्यांचे आदराने स्वागत केले जाते. चहापान करून त्यांना जेवण्यास आग्रह केला जातो. ते जेवण केल्याशिवाय पाहुण्यांना कधीच परत जाऊ देत नाहीत. ते पाहुण्यांना भरपूर खा म्हणून आग्रह करतात. त्यांना नको नको म्हटले तरी भरपूर जेवण वाढतात. जेवण झाल्याच्या नंतर ख्यालीखुशाली विचारून एकमेकांच्या गावाकडील नव्याजुन्या गोष्टींना उजाळा देतात. म्हणजे या गरिबांना आलेल्या पाहुण्यांबद्दल खूप अप्रूप वाटते. ते त्या पाहुण्यांना दोन-चार दिवस राहा म्हणून आग्रह करतात. म्हणजे त्यांना आलेले पाहुणे लवकर परत जाऊ नये असे वाटते. ते घरी आलेल्या पाहुण्यांना देवासमान समजतात, म्हणतात ना अतिथी देवो भव, याचा प्रत्यय आपल्याला अशा गरीबांच्या घरांमध्ये पाहायला मिळतो. श्रीमंत लोक खूप गर्विष्ठ आणि अहंकारी असतात. ते स्वतःला खूप महान व श्रेष्ठ समजतात. आणि गरिबांना कमी लेखून त्यांची टिंगल टवाळी करतात. गरिबांच्या लग्नाला न जाणे, गरिबांच्या अंत्यविधीला न जाणे, गरिबांच्या कोणत्या कार्यक्रमाला न जाणे, हे गुण त्यांच्यात हमखास पाहायला मिळतात. गरिबांच्या कार्यक्रमाला व अंत्यविधीला जाणे त्यांना अपमानास्पद वाटते. पण श्रीमंताच्या कार्यक्रमाला व अंत्यविधीला जाणे त्यांना प्रतिष्ठेचे लक्षण वाटते. म्हणून हे लोक आपल्यापेक्षा श्रीमंत लोकांच्या लग्नाला वा कार्यक्रमाला हमखास जातात. कारण तिथे प्रतिष्ठित मंडळींचा सत्कार केला जातो. त्यांना सर्वसामान्य व गरीब लोकांपासून वेगळे बसवले जाते. या श्रीमंत लोकांमध्ये असणारी एक गोष्ट मला खूप खटकते, ती म्हणजे अंत्यविधीला गेल्यावर हे लोक स्नान करून, जेवण करून आणि पांढऱ्या शुभ्र कपड्यामध्ये अंत्यविधीत सामील होतात आणि आपल्या श्रीमंतीचे प्रदर्शन करतात. आणि दहनभूमीवर गेल्यावर तिथे मौन न पाळता आपसात चर्चा करतात आणि हसतात पण! आपण कशासाठी आलोय आणि आपण काय करतोय? याचे भान देखील या श्रीमंतांना नसते. एवढे निसाक वृत्तीचे हे लोक असतात. श्रीमंताचे आईवडील कैलासवासी झाल्यावर सुद्धा हे लोक वरील प्रमाणेच वागतात. त्यांना ना कशाची लाज, ना कशाची लज्जा! दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आई-वडिलांची काळजी घेण्यात श्रीमंत मुलापेक्षा गरिब मुलाचाच वाटा अधिक असतो. श्रीमंत घरातील आई-वडीलांची काळजी घेण्यात ही श्रीमंत मुले कमी पडतात. आई-वडिलांची सेवा करण्यात कुचकामी ठरतात. श्रीमंतांना आईवडील बोज वाटायला लागतात. आईवडील कधी कैलासवासी होतील आणि आपल्या मागील दगदग कधी कमी होईल, असे त्यांना वाटते. पण गरीब घरातील मुले आई-वडिलांची काळजी घेण्यात व त्यांचे योग्य पालन पोषण करण्यात सिंहाचा वाटा उचलतात. आई-वडिलांमुळे घराला घरपण येते, याची त्यांना चांगली जाण असते. म्हणून ते आई वडिलांना जीवापाड जपतात. त्यांना वेळेवर जेवण देणे, त्यांचा वेळेवर दवाखाना करणे आणि त्यांना काय हवे आणि काय नको? हे बघणे ते आपले कर्तव्य समजतात. म्हणून अशा गरीब मुलांना मनापासून सलाम करावा वाटतो. रस्त्यावर एखादा अपघात झाला आणि त्या अपघातग्रस्त रुग्णांना दवाखान्यात नेण्यासाठी हे श्रीमंत म्हटले जाणारे लोक एखादी गाडी बघून त्या अपघातग्रस्त रुग्णांना रुग्णालयात दाखल न करता व्हिडिओ करण्यात मश्गूल असतात पण माणुसकीच्या नात्याने एखाद्या गाडीमध्ये टाकून त्या अपघातग्रस्तांना त्वरित रुग्णालयात दाखल करण्याची त्यांची मानसिकता नसते. तो अपघाताचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करणे आणि बघ्याची भूमिका घेऊन तिथून निघून जाणे या गोष्टी श्रीमंत लोक हमखास करतात. पण गरीब म्हटले जाणारे लोक बघ्याची भूमिका कधीच घेत नाहीत. रोडवर जात असताना एखाद्या व्यक्तीचा अपघात झाला तर हे गरीब म्हटले जाणारे लोक त्या अपघातग्रस्त व्यक्तींना माणुसकीच्या नात्याने त्वरित रुग्णालयात नेऊन त्यांना दाखल करतात. आणि त्या अपघातग्रस्त रुग्णांचा जीव वाचवतात. एवढे महान कार्य हे गरीब लोकच करू शकतात. कारण त्यांच्यात मानवता पोतप्रोत भरलेली असते.म्हणजे श्रीमंतापेक्षा गरिबांमध्ये माणुसकी ठासून भरलेली असते. याचा प्रत्यय आपल्याला अशा माणुसकी दर्शवणाऱ्या प्रसंगातून होतो. दारावर आलेल्या भिकाऱ्याला दानधर्म करण्याची दानत श्रीमंतात कधीच नसते. ते दारावर आलेल्या भिकाऱ्याला दानधर्म तर करतच नाहीत. उलट त्यांचा अपमान करून त्यांना घराबाहेर काढतात आणि घरात पोसलेल्या कुत्र्याला मात्र काजू, बदाम, पिस्ता व दूध खाऊ घालतात. म्हणजे माणसापेक्षा त्यांना कुत्रा मौल्यवान वाटतो. एवढी अमानुषता या श्रीमंत लोकांमध्ये ठासून भरलेली असते. म्हणून अशा लोकांचा मला खूप तिरस्कार वाटतो. म्हणून बांधवांनो या श्रीमंत लोकांवर कधीच विश्वास ठेवू नका... यांच्यावर कोणती आशा-अपेक्षा ठेवून जगू नका... हे भविष्यात आपल्याला मदत करतील हा गैरसमज काढून टाका. हे श्रीमंत लोक आपल्याला मदत तर करतच नाहीत पण उलट आपल्याला गोड गोड बोलून आपलेच खाऊन जातात आणि मग मात्र आपल्याला विसरतात. आपली जेव्हा गरज पडेल तेव्हा आपल्याला जवळ करण्याचा प्रयत्न करतात. यांच्यात मानवता तर नसतेच पण यांच्यात अमानुषता व स्वार्थीपणा ठासून भरलेला असतो. खरंतर आपणच या श्रीमंतांना डोक्यावर घेतो आणि यांच्या मोठेपणाचे गोडवे गातो. यांना मोठेपणा देणे व यांची किंमत करणे अगोदर बंद करा. आपोआप हे लोक माणसात येऊन, माणुसकीने वागतील..



**बुध्दभूषण कांबळे**
**अहमदपूर, मो.७४९८७१५६६१**

# कै.कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतनची राज्यात गरुड भरारी

**प्रा.डॉ.सुनिलदत्त कुलकर्णी**

***अक्कलकोट/प्रतिनिधी:***

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान संचलित कै.कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयातून आज अनेक विद्यार्थ्यांनी उज्वल उज्वल यश संपादन करून उत्तुंग झेप घेतली आहे. या माध्यमातून कै.कल्याणराव इंगळे या तालुक्यातील एकमेव तंत्रनिकेतनमुळे विद्यार्थ्यांच्या अंगी असलेली गुणवत्ता सिध्द झाली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशात कै.कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयाचा व येथील तंत्र शिक्षण प्रणालीचा अमुल्य वाटा आहे. या माध्यमातून तालुक्यातील विद्यार्थ्याची योग्य जडणघडण झाल्याने कै.कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयाला राज्यात नावलौकीक प्राप्त झाला आहे. अल्पावधीतील महाविद्यालयाची ही कामगिरी दखल घेण्याजोगी आहे, म्हणून कै. कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतनने राज्यात गरुड भरारी घेतली असल्याचे प्रतिपादन सोलापूर येथील विद्या विकास प्रतिष्ठान (व्हीव्हीपी) तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुनिलदत्त कुलकर्णी सर यांनी केले. आज येथील कै.कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयास प्राचार्य डॉ.सुनिलदत्त कुलकर्णी यांनी सदीच्छा भेट देवून महाविद्यालयाचे संस्थापक कै.कल्याणराव इंगळे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मानवंदना समर्पित करून प्रथमेश इंगळे यांच्यावतीनं कै.कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या उपक्रमांविषयी जाणून घेतल्यानंतर प्रा.डॉ.सुनिलदत्त कुलकर्णी बोलत होते. यावेळी कै.कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या वतीने प्रथमेश इंगळे यांनी प्रा.डॉ.सुनिलदत्त कुलकर्णी यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सत्कार केला. यावेळी श्री. स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, प्रथमेश इंगळे, कै. कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे प्रा.नागनाथ जेऊरे, मनोज शिंपी, विजय पवार, श्रीकांत झिपरे, उमेश सोनवणे, सचिन घाटगे, बावठाणकर, बंटी नारायणकर, प्रा. शिवशरण अचलेर, रविंद्र नष्टे, दर्शन घाटगे, संदीप गोंडाळ, धनराज स्वामी, गिरीश पवार, प्रविण घाटगे, आदीत्य गवंडी, तुषार मोरे आदींसह कै.कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



प्रा.डॉ.सुनिलदत्त कुलकर्णी यांचा सत्कार करताना प्रथमेश इंगळे तर दुसऱ्या छायाचित्रात कै.कल्याणराव इंगळे यांच्या पुतळ्यास मानवंदनप्रसंगी प्रा.डॉ.सुनिलदत्त कुलकर्णी, अमोलराजे भोसले, प्रथमेश इंगळे, प्रा.नागनाथ जेऊरे व अन्य दिसत आहेत.

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक श्री.शशिकांत आकाराम पाटील यांनी प्रीतिसंगम प्रिंटर्स, कोयना औद्योगिक वसाहत, मलकापूर–कराड येथे छापून गोदावरी प्लाझा, हेड पोस्टाजवळ, शनिवार पेठ कराड, येथे प्रसिद्ध केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. R.N.I.No.MAHMAR./२००१/१०३३८ रजिस्टर No.MAHMAR/14511/13/1/96/Te पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 *मुख्य कार्यालय:– गोदावरी प्लाझा, हेड पोस्ट जवळ, शनिवार पेठ कराड, जि.सातारा, पिनकोड – ४१५११० फोन (०२१६४)२२७७२५,,फॅक्स २२६९२५, * सातारा कार्यालय:– संजीवन सीटी स्कॅन शेजारी, सिव्हील हॉस्पिटल रोड, सातारा फोन नं:–९२२६३९८८१७ RNI.mar/२००१/१०३३८.
email-pritisangamkarad@gmail.com

# अचलेर मध्ये वृद्ध आई वडिलांना मुलाकडून जीवे मारण्याची धमकी

## माजी सैनिकाने घातला शेतात कब्जा

**अचलेर/प्रतिनिधी:**

लोहारा तालुक्यातील अचलेर येथील वृद्ध आई आणि वडीलांना मुलाने शारीरिक आणि मानसिक व आर्थिक त्रास देत जीवे ठार मारण्याची नेहमी धमकी देत असल्याची तक्रार वृद्ध आई आणि वडीलांनी मुरूम पोलिस ठाण्यात दाखल केली असून गावातील सावकार असलेल्या माजी सैनिकाने आपल्या शेतात कब्जा घालून शेत हडप करण्याचा प्रयत्न करीत असल्याची तक्रार पोलिस अधीक्षक धाराशिव यांच्याकडे केली आहे.

अचलेर येथील वृद्ध नागरिक चंदकांत लिंबण्णा दलाल आणि त्यांच्या वृद्ध पत्नी सौ संगव्वाबाई दलाल दोघेही राहणार अचलेर तालुका लोहारा जिल्हा धाराशिव यांनी धाराशिव जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक आणि जिल्हाधिकारी यांना दिलेल्या तक्रारीमुळे अचलेर गावात मोठी खळबळ उडाली असून सावकारी धंदा व व्याजबट्टी करणाऱ्या सावकार लोकांमध्ये मात्र चिंता पसरली आहे.

या बाबत मिळालेली माहिती अशी की, अचलेर येथील वृद्ध नागरिक चंदकांत लिंबण्णा दलाल आणि त्यांच्या वृद्ध पत्नी सौ संगव्वा चंद्रकांत दलाल यांची शेती असून ही शेती त्यांचा मुलगा महादेव चंदकांत दलाल याने परस्पर गावातील सावकारा कडे गहाण ठेवली असल्याचे वृद्ध दलाल दांपत्याने सांगितले. सावकाराने व्याजासह मुद्दलचे पैसे दहा पट केली असल्याचे त्यांनी सांगितले.

ही दहापट रक्कम द्या नाही तर शेत ताब्यात घेतो म्हणून शेतात कब्जा घातला असल्याची तक्रार चंदकांत दलाल यांनी मुरूम पोलिस ठाण्यात नोंदविली असून गजपाल सिंह सुरेशसिंह बायस, आणि गोपालसिंह बायस यांच्या विरोधात विरोधात कलम बी एन एस एस १७४अन्वये एन सी आर मुरूम पोलिस ठाण्यात ४ जून २५ रोजी दाखल असून पुढील तपास मुरूम पोलीस करीत आहेत

दरम्यान चंदकांत लिंबण्णा दलाल यांनी दिलेल्या तक्रारीत म्हंटले आहे की, आपल्या मधला मुलगा



महादेव हा व्यसनाधीन असून त्याने व त्याची पत्नी काशीबाई महादेव दलाल यांनी मिळून आपणास वारंवार मारहाण करीत असून आपला आम्हा दोघा वृद्ध आई वडिलांचा मानसिक आणि शारीरिक छळ करीत असून आर्थिक त्रास देत आहेत त्यांनी वारंवार पैशाची मागणी करून आपला सतत आणि दररोज आर्थिक छळ करून त्रास देत आहेत आणि आम्हा दोघांना जीवे ठार मारण्याची धमकी देत असून घरी दररोज घाण घाण शिवीगाळ करून आम्हाला मोठ्या प्रमाणात त्रास देणे सुरूच ठेवले आहे.

सावकार माजी सैनिक बायस यांनी माझ्या शेतात कब्जा घातला असून माझी खरीप पिकांची पेरणी अडवून ठेवली आहे असेही दलाल यांनी सांगितले.

# 'नागठाणे महाविद्यालयात संगणक कक्षाचे उदघाटन

**नागठाणे/प्रतिनिधी : -**

आर्टस्, कॉमर्स एड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयात 'स्व. सौ. विजयालक्ष्मी शिंदे संगणक कक्ष', 'स्मार्ट क्लासरूम' यांचे उदघाटन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. याचवेळी स्व. सौ. विजयालक्ष्मी शिंदे यांच्या अर्धपुतळ्याचे अनावरण आणि त्यांच्या कार्यावर लिहिलेल्या 'स्वप्नपूर्ती' या प्रेरणादायी पुस्तकाचा प्रकाशन समारंभही मान्यवरांच्या शुभहस्ते उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे जसविंदर नारंग म्हणाले, रोहित शिंदे यांनी आपल्या आईच्या स्मरणार्थ या महाविद्यालयात संगणक कक्ष तयार करून दिला आहे. त्यांच्या आईचे कार्य यानिमित्ताने ते पुढे नेत आहेत. त्यांचे हे कार्य अतिशय स्तुत्य आहे. असे गौरव उदगार त्यांनी काढले. तसेच कार्यक्रमाचे दुसरे पाहुणे पी. सी. नंबियार यांनी रोहित शिंदे यांच्या



कार्याबद्दल आणि यांच्या दातृत्वाबाबत कृतज्ञता व्यक्त करत महाविद्यालय राबवित असलेल्या स्तुत्य उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतले. पुढे खेड्यापाड्यातील ग्रामीण भागातील बहुजन दिन दलित समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे यासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली. त्यांच्या या शैक्षणिक कार्याला समाजातून अनेक दातृत्वाचे हात पुढे आले. त्यांनी शैक्षणिक कार्याला वाहून घेतले, मातीशी एकरूप झाले आणि ज्ञानमंदिरे निर्मिली. आज ४०७ सांस्कृतिक केंद्रातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला जात आहे.

ते म्हणाले, रोहित शिंदे यांनी आपल्या आईला ईश्वर मानलं. लाखो रुपये देणगी देऊनही माझ्या नावाची वाच्यता करू नका ही त्यांची अट म्हणजे स्वार्थी दुनियेत दातृत्वाच्या नावाखाली आत्मप्रौढी मिरवणाऱ्यांसाठी चपराक आहे. त्यांच्यात परमेश्वराचा अंश आहे. त्यांच्या हातून असेच निरंतर समाजसेवेचे कार्य घडावे.

कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांनी प्रास्ताविकात संस्था आणि महाविद्यालय यांच्या कार्याचा आढावा घेतला. डॉ. सुरेश पाटील यांनी 'स्वप्नपूर्ती' या पुस्तकाविषयी आपले मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया प्रा.लि.चे प्रवीण शिर्के), ज्येष्ठ समाजसेविका सुहासिनी माने, सिरम इन्स्टिट्यूटचे सिनिअर डायरेक्टर रोहित शिंदे, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी जयसिंगराव जाधव, कौस्तुभ गावडे, अशोक शिंदे, रोहित शिंदे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राजाराम कांबळे, प्रा. अभय जायभाये यांनी आभार मानले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून अर्थशास्त्र विभागाच्यावतीने स्व. सौ विजयालक्ष्मी शिंदे यांच्या कार्यावर आधारित 'माऊली' या पोस्टरचे उदघाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# श्री मळाईदेवी शिष्यवृत्ती परीक्षेत आदर्श विद्यालयाचे यश

**कराड/प्रतिनिधी : -**

इयत्ता पाचवी पूर्व उच्च प्राथमिक व इयत्ता आठवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेच्या पर्वतयारीच्या दृष्टीने चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी श्री मळाईदेवी शिक्षण संस्थेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या श्री मळाईदेवी शिष्यवृत्ती परीक्षेत आदर्श प्राथमिक विद्यालय व शिशुविहार आगाशिवनगरच्या विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश प्राप्त केले.

यामध्ये इयत्ता चौथीमधील अंशुल सुरेश शिंदे याने २३० गुण प्राप्त करुन प्रथम क्रमांक मिळविला. मंथन मयूर गरुड याने (२२८ गुण) द्वितीय, विराज किशोर पाटील (१९२ गुण) तृतीय, श्रेयस सचिन चव्हाण (१९० गुण) चतुर्थ क्रमांक मिळवून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

या सर्व विद्यार्थ्यांना श्री मळाईदेवी शिष्यवृत्ती विभाग प्रमुख सोपान जगताप, सौ. अश्विनी यादव




यांच्यासह सौ. रंजना कांबळे, सौ. प्राजक्ता पाटील, रफिक सुतार, वैभव शिर्के, सौ. नंदा पानवळ, सौ. शबाना मुल्ला, सौ. रूपाली कुंभार, सौ. सारिका पवार, सौ. आकांक्षा झुमर, सौ. सोयराबानू नदाफ, सौ. वनिता कुंभार, सौ. मेघा बाटे, सौ. शितल भिसे, सौ. शोभा मोरे, विद्यालयाचे मुख्याध्यापक सचिन शिंदे, शिशु विहारच्या मुख्याध्यापिका लता नलवडे यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे सचिव अशोकराव थोरात, अध्यक्ष पांडुरंग पाटील, उपाध्यक्ष भास्करराव पाटील, खजिनदार तुळशीराम शिर्के, संचालक वसंतराव चव्हाण, संचालिका डॉ. स्वाती थोरात, संचालक संजय थोरात यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

# श्रीमती प्रेमलाताई चव्हाण पॉलिटेक्निकचे उन्हाळी परीक्षेत यश

**कराड/प्रतिनिधी : -**

यशवंत विद्यापीठ, कराड संचलित श्रीमती प्रेमलाताई चव्हाण पॉलिटेक्निक, कराडचा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ मुंबई यांचेमार्फत घेण्यात आलेल्या उन्हाळी परीक्षेत सर्व विभागाच्या विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश मिळविले.

यामध्ये कॉम्प्युटर इंजिनिअरींग प्रथम वर्षामध्ये साकिरुद्दीन शेख ९३.६५, यास्मिन कोरबु ९२.८२, सिद्धी देसाई ९०.५९ टक्के, व्दितीय वर्ष आर्या थोरात ९१.२९, अदित्य सूर्यवंशी ९०.३५, संचिता शेवाळे ८८.०० व तृतीय वर्षामध्ये प्रतिक्षा ढेरे ९०.४६, गिरीजा जाधव ८९.२० व मधुरा वीर ८८.४० टक्के गुण मिळवून यश संपादन केले. त्यामूळे जिल्हयातील विद्यार्थ्यांची कॉम्प्युटर इंजिनिअरींग विभागासाठी



श्रीमती प्रेमलाताई चव्हाण पॉलिटेक्निकला पसंती मिळत आहे. तसेच प्रथम वर्षाच्या साकिरुद्दीन शेख, ऋतुजा पाटील, सिद्धी देसाई व श्रुती ढेबे या विद्यार्थ्यांनी अप्लाईड मॅथेमॅटिक्स विषयात १०० पैकी १०० गुण संपादन केले. यासाठी त्यांना मॅथेमेटिक्सच्या प्रा. तंजीला शिकलगार यांनी मार्गदर्शन केले. तसेच अन्य कोर्सेसचाही निकाल चांगला लागला आहे. उत्कृष्ठ निकालाबरोबरच प्लेसमेंटसाठीही तंत्रनिकेतनमार्फत मार्गदर्शन केले जाते. नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी संगणक विभागातील ओपन इलेक्टिव्ह विषयांचे केंद्रही तंत्रशिक्षण मंडळाने संलग्नता दिलेली आहे.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष किणीकर, सेक्रेटरी शिरीष किणीकर, उपाध्यक्षा सौ. पुष्पा किणीकर, प्राचार्य स्वागत, सर्व विभागप्रमुख, अधिव्याख्याते व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# एनसीसी शिबिरात गुरुकुल स्कूलने मिळवली जिल्ह्यात सर्वात जास्त पारितोषिके

## बेस्ट स्कूल व बेस्ट ड्रिल स्पर्धेत प्रथम क्रमांक

**सातारा/प्रतिनिधी:**

गोडोली शाहूनगर येथील गुरूकुल एज्युकेशन सोसायटीच्या इंग्रजी माध्यम गुरूकुल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक उपक्रमाबरोबरच सांस्कृतिक, सामाजिक, कला, क्रीडा, विज्ञान, खेळ, राष्ट्रप्रेम यासारखे विविध उपक्रम राबविण्यात येतात.

महागाव येथे २२ महाराष्ट्र बटालियन सातारा, हेड ऑफिस कोल्हापूर यांच्या माध्यमाने दिनांक १६ मे ते २७ मे व ३ जून ते १२ जून दरम्यान वार्षिक प्रशिक्षणाचे शिबीर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये सातारा जिल्हातील विविध प्रकारच्या अनुदानित, विनाअनुदानित माध्यामातील ३२ विद्यालयातील एनसीसी छात्रांनी सहभाग नोंदवला.

या शिबिराचे आयोजन कमांडिंग ऑफिसर एम. ए. राजमन्नार (सेनामेडल), डम ऑफिसर आनंद सिंग, सुभेदार मेजर तानाजी भिसे, जेसीओ पीआय स्टाफ आणि एएनओ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

शिबिरा दरम्यान बेस्ट स्कूल, बेस्ट ड्रील, बेस्ट सोलो ड्रील, बेस्ट कॅडेट्, ग्रुप डान्स, ग्रुप साँग, फायरिंग यासारखे विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

सातारा जिल्ह्यातील या एनसीसी शिबिरामध्ये सर्वात जास्त एकूण सांघिक ६ पारितोषिके आणि १८ वैयक्तिक मेडल्स मिळालेली गुरुकुल स्कूल ही एकमेव स्कूल ठरली. यासर्व स्पर्धांमध्ये गुरुकुलच्या कॅडेट्सने उज्वल कामगिरी केली.

बेस्ट स्कूल स्पर्धा - प्रथम क्रमांक, बेस्ट ड्रिल स्पर्धा -प्रथम क्रमांक, बेस्ट ग्रुप डान्स - प्रथम क्रमांक, बेस्ट ग्रुप साँग - द्वितीय क्रमांक, बेस्ट कॅडेट् - स्वस्तीश्री राजपूत व स्वरा दड

फायरिंग - सई जगदाळे, मधुरा शेलार, सत्यम चव्हाण, निर्जला पवार, प्रगती सावगावे, क्वार्टर गार्ड - प्रगती सावगावे, सई घाडगे, मुग्धेश कोडग, वेदांती जाधव, आर्या बेंद्रे, मधुरा शेलार, वैष्णवी साळुंखे, गुरुप्रसाद वेळेकर, सत्यम चव्हाण, बेस्ट




सोलो ड्रिल - स्वरा दड, विराज शेलार, बेस्ट अँकरिंग - स्वस्तीश्री राजपूत, स्वरा दड, कॅम्प सिनीअर - श्रेया जाधव, पायलिटींग - राजवर्धन मोरे, ओजस जगताप,कॅम्प फोटोग्राफी - ओजस जगताप, ओंकार महामुलकर, शौर्य घाडगे, गेस्ट लेक्चर सहभाग - ओजस जगताप, विराज शेलार.

या यशाबद्दल गुरुकुल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष राजेंद्र चोरगे, कमांडिंग ऑफिसर एम ए राजमन्नार (सेना मेडल) सुभेदार मेजर, संभाजी भिसे यांनी कॅडेट्सचे अभिनंदन केले.

यावेळी सचिव आनंद गुरव, अॅड. ऐश्वर्या चोरगे, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका शीला वेल्हाळ, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका अनुराधा कदम, माध्यमिक विभागाच्या उपमुख्याध्यापिका सोनाली तांबोळी, जनसंपर्क अधिकारी विश्वनाथ फरांदे उपस्थित होते.

२२ महाराष्ट्र बटालियनचे सीओ एम ए राजमन्नार यांनी ट्रूपचे विशेष कौतुक केले. एनसीसी -छज सौ. मेघा तपासे, एनसीसी प्रशिक्षक दत्तात्रेय येवले यांच्या मार्गदर्शनाखाली कॅडेट्सनी हे घवघवीत यश संपादन केले आहे.

यावेळी राजेंद्र चोरगे म्हणाले कि, विद्यार्थ्यांच्या अंगी राष्ट्रप्रेम व स्वयंशिस्त निर्माण होण्यासाठी चार वर्षापूर्वी शाळेमध्ये एनसीसी विभाग सुरु करण्यात आला. एनसीसीमुळे गुरुकुलचे कॅडेट्स भविष्यात राष्ट्राच्या सेवेत दिसतील असे आम्हा सर्वांना विश्वास वाटतो. सदर शिबिरामध्ये कॅडेट्सचे यश त्यांच्या उज्वल भविष्यासाठी प्रेरणादायी ठरणारे असून शाळेसाठी ही अभिमानाची बाब आहे.

अर्जुन चोरगे, मधुकर जाधव, नितीन माने, संजय कदम, उदय गुजर, दिपक मेथा, जगदिश खंडेलवाल, राजेंद्र खंडेलवाल, अंबाजी देसाई, हरिदास साळुंखे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व शिक्षक पालक संघ सदस्य उपस्थित होते.

# एल.आर.पी आयुर्वेदिक कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त भक्तियोग उत्साहात साजरा

**इस्लामपूर/प्रतिनिधी:**

अकराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सांगली जिल्हा परिषदच्या वतीने संपुर्ण जिल्ह्यात एकाचवेळी भक्ती योग साजरा करण्यात आला.

यामध्ये कॉलेजच्या विद्यार्थी व स्टाफने सहभाग घेतला. आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधुन कॉलेजच्या वतीने योगासन स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, योग रील स्पर्धा, पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. योगासन स्पर्धेत स्वप्नील चौरे, ऋतुजा काळे व उदय शिंदे ह्यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळाला. निबंध स्पर्धेत संतोषी शर्मा, वैष्णवी शिंगणे, वैष्णवी पिसे ह्यांना अनुक्रमे क्रमांक मिळाला. वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक तेजस्विनी कवडे, द्वितीय क्रमांक संतोषी शर्मा, तृतीय क्रमांक विभागुन वैष्णवी भिसे व वैष्णवी सर्जे ह्यांना मिळाला. पोस्टर स्पर्धेत्व प्रथम क्रमांक डॉ.अंकिता गोडवे, द्वितीय क्रमांक गायत्री काळे, तृतीय क्रमांक रिद्धी जाधव



यांना मिळाला. योग रील स्पर्धेत ऋषिकेश भाटिया व ग्रुपला प्रथम क्रमांक व दिशा चव्हाण व ग्रुपला द्वितीय क्रमांक मिळाला. रांगोळी स्पर्धेत प्रांजल भालेराव व ग्रुप ला प्रथम क्रमांक, भूमिका बोरकर व ग्रुपला द्वितीय, दिशा चव्हाण व ग्रुपला तृतीय क्रमांक मिळाला. योग सप्ताहामध्ये प्रा.सदाशिव कुंभार यांचे योग विषयक व्याख्यान झाले. ह्या विविध उपक्रमांचे नियोजन स्वस्थवृत्त व योग विभाग प्रमुख डॉ. राहुल नाकील, डॉ.श्वेता नाकील, डॉ.ज्योती चौरे, डॉ.अजयकुमार पत्तार ह्यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अभिमन्यु पाटील, उपप्राचार्य डॉ.रणजीत मोहिते, श्रीकांत यादव यांचे मार्गदर्शन लाभले.



# महाराष्ट्र हायस्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

**कराड/प्रतिनिधी : -**

येथील महाराष्ट्र हायस्कूलमध्ये २१ जून रोजी सकाळी ११ वाजता आंतरराष्ट्रीय योग दिन सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी विविध प्रकारचे योग आसने करून साजरा केला. याप्रसंगी विद्यालयातील एन. सी. सी.चे कॅडेट व कमांडर ऑफिसर आर. के. ठाकरे उपस्थित होते.


यामध्ये विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. एस. लादे यांनी योगाविषयी माहिती सांगितली. तसेच क्रीडा शिक्षक एस. बी. शिंदे यांनी मुक्त हालचाली व योगासने करून दाखवले. त्याप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांनी कृती केली. तसेच एन. जे. खाडे यांनीही योगाविषयी महत्व पटवून सांगितले. यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस. एल. घुलुम यांनी केले एम. जे. सूर्यवंशी यांनी आभार मानले.

# शुभम साळुंखे चे विविध स्पर्धा परीक्षेत उज्वल यश

**पुसेगाव/प्रतिनिधीं:**

विसापूर तालुका खटाव येथील जिल्हा परिषद शाळेचा विद्यार्थी शिवम अमोल साळुंखे यांनी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तुंग असे यश संपादन करून विसापूर जिल्हा परिषद शाळेचे नाव उज्वल केले आहे.

विसापूर येथील जिल्हा परिषद शाळा इयत्ता तिसरी मध्ये शिकत असलेला शिवम अमोल साळुंखे यांनी नुकत्याच घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षा अभिरूप आयएएस स्पर्धा या स्पर्धेत जिल्ह्यामध्ये द्वितीय क्रमांक मिळवला असून १५० पैकी १३८ गुण त्याला प्राप्त झाले. त्याचबरोबर मंथन या परीक्षेमध्ये १५० पैकी १३६ गुण मिळवून राज्यात आठवा तर जिल्ह्यात तिसरा आला याशिवाय ज्ञानांजन या परीक्षेमध्ये १०० पैकी ९२ गुण मिळवून शिष्यवृत्तीसाठी पात्र झाला. या परीक्षा चांगल्या मार्कांनी उत्तीर्ण झाल्याने



नुकतेच फलटण येथे त्याला सिल्वर मेडल देऊन गौरवण्यात आले. या त्याच्या यशासाठी मुख्याध्यापक लतिका करपे, शुभांगी चव्हाण, ज्ञानेश्वर धायगुडे या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. या त्याच्या यशा पाठीमागे आई-वडील आजी आजोबा यांचा मोलाचा वाटा आहे. या यशाबद्दल जिल्हा परिषद शाळा विसापूर ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले आहे.

# निनाईदेवी हायस्कूलमध्ये योग दिन मोठ्या उत्साहात साजरा

**कोळे/प्रतिनिधी : -**

तुळसण, ता. कराड येथील निनाईदेवी हायस्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सुरुवातीला प्रार्थना घेऊन योग दिनाची सुरुवात करण्यात आली. यावेळी ताडासन, वृक्षासन, अर्ध चक्रासन, वक्रासन या आसनांचा प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांकडून करून घेण्यात आले. प्राणायाम व कपालभाती याचा अभ्यास मुलांकडून केला गेला.

यावेळी बोलताना मुख्याध्यापक कुलकर्णी म्हणाले, योग साधना प्राचीन कालखंडापासून ऋषीमुनींनी अवगत केलेली आहे. आपले शरीर निरोगी राहण्यासाठी योगाचा अभ्यास करणे आज काळाची गरज बनली आहे. कारण आहार आणि विहार मानवी जीवनातील महत्त्वाचे घटक आहेत. वाढते प्रदूषण यामुळे मनुष्याला अनेक रोगांना सामोरे जावे लागत आहे. याच्यावर मात करण्यासाठी योग साधना हा उत्तम उपाय आहे. मानवी जीवनामध्ये सकारात्मकता असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांना अभ्यास करताना मन एकाग्र होण्यासाठी योग साधनेतील अनेक आसनांचा उपयोग होतो. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी योग



साधना शिकून आपले जीवन सुखमय करावे.

यावेळी क्रीडा शिक्षक जानुगडे यांनी योगाची विविध प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांना स्वतः करून दाखवले. पोतदार सर यांनी सूत्रसंचालन करून आभार व्यक्त केले.

# रघुकुल विद्यालयात नवांगतांचे स्वागत

**मल्हारपेठ/प्रतिनिधी : -**

सुयश मेडिकल अँड चॅरिटेबल सोसायटी, नाडे संचलित रघुकुल बालमंदिर, प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ विद्यालयात नव्याने प्रवेश करणाऱ्या नवांगतांच्या स्वागताने झाला. यावेळी विद्यालयाच्या प्रवेशद्वारापासून नवीन विद्यार्थ्यांची वाजत-गाजत प्रभात फेरी काढण्यात आली.

नवांगतांच्या स्वागतासाठी विद्यालयाचे संचालक विक्रम देसाई यांची प्रमुख उपस्थिती, तर प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सविता सुर्वे, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका शुभांगी नलवडे, तसेच सर्व विभागाचे शिक्षक उपस्थित होते.

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ सोमवार (दि. १६) रोजी झाला. यावेळी रघुकुल विद्यालयात नव्याने प्रवेश घेणारे सर्व विद्यार्थी यांचे स्वागत विद्यालयाच्यावतीने मोठ्या उत्साहात करण्यात आले. प्रारंभी या नवांगतांची



नाडे : नवांगतांच्या स्वागतप्रसंगी संस्थेचे संचालक विक्रम देसाई व शिक्षक.

प्रभात फेरी विद्यालयाच्या प्रवेशद्वारापासून वाजत-गाजत काढण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या बोटाचे ठसे घेऊन वृक्षाची प्रतिकृती तयार करण्यात आली. त्याचबरोबर या सर्व नूतन विद्यार्थ्यांचे स्वागत शाळा प्रशासनाच्यावतीने गुलाब पुष्प आणि पुस्तके भेट देऊन करण्यात आले.

यावेळी बोलताना संस्थेचे संचालक विक्रम देसाई म्हणाले, रघुकुल विद्यालयाने नेहमीच शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करत विद्यार्थी घडवण्याचे काम केले आहे. आज शाळेचा पहिला दिवस असून, नव्याने प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना आपल्या शैक्षणिक जीवनात यशस्वी होण्याचा एक चांगला पर्याय त्यांनी निवडला आहे. त्यांनीही या विद्यालयाच्या ज्ञानाचा फायदा घेऊन आपली यशस्वी वाटचाल पूर्ण करावी.

प्रास्ताविक प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सविता सुर्वे, स्वागत मुख्याध्यापिका शुभांगी नलवडे, सूत्रसंचालन एन. जी. बोरसे, तर एस. एस. भिसे यांनी आभार मानले.

सदर शुंभाक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे कृपया दुरुपयोग करु नये.

**नशिबाची परीक्षा**

सोमवार २३ जून २०२५

**मिलनम डे**

उदय-अस्त | सिंगल ०-३-७ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| 190 / 280 / 460 | 0-1 | 146 / 470 / 344 | जोड 08-21-39-47-15 |

**कल्याणम**

उदय-अस्त | सिंगल ८-१-५ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| 125 / 260 / 468 | 8-9 | 126 / 270 / 225 | जोड 82-69-01-57-94 |

**मुंबैम (मेन )**

उदय-अस्त | सिंगल १-४-६ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| 137 / 380 / 335 | 1-8 | 170 / 189 / 116 | जोड 12-98-45-60-87 |

दिवाळी बंपर चान्सू तयार आहे संपर्क क्रमांक मो.नं. ९९७५४७९८२६

**आज का अंदाज**

सोमवार दिनांक २३ जून २०२५

| कल्याण बाजार 'पत्थर फोड एकच' | मुंबई बाजार 'पत्थर फोड एकच' |
|---|---|
| १ - ४ - ७ - ८ | २ - ५ - ६ - ७ |
| २४५-२४८-१६०-२८८ | २४६-२५८-१६९-८९० |
| ५६०-३४७-२५०-३७८ | ३९०-७८०-३३०-७०० |
| ४८९-४४६-३४०-४७७ | ४८०-३५७-२४०-४४९ |
| जोडी | जोडी |
| १० -४० - ७२ - ८२ | २० -५० - ६८ - ७३ |
| १९ -४९ - ७३ - ८३ | २९ -५१ - ६४ - ७४ |
| १६ -४६ - ७५ - ८५ | २१ -५९ - ६३ - ७८ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस २३-२४ जून
प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

सोमवार दिनांक २३ जून २०२५

सर्व बाजार साठी

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ३१ | ६८ | ९८ |
| २७ | ३७ | ६४ | ९४ |
| २० | ३० | ६५ | ९५ |
| १२९ | ४९० | ६०० | १८० |
| २४६ | ५८० | ५५६ | ३७९ |
| ३९० | ६७० | २७७ | ४५० |

टिप- कल्याण व मुंबई करिता व सर्व बाजारासाठी ६० पानाचा चार्ट मिळेल १००% खात्रीशीर फक्त सोमवारी मिळेल

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

## तडवळे येथे प्रसंगावधानामुळे बालिका वाचली

# बिबट्याच्या बंदोबस्तासाठी दिल्ली पासून गल्लीपर्यंत सूत्रे हालली

**शिराळा/प्रतिनिधी:-**

तडवळे (ता. शिराळा) येथील काळवट परिसरात सकाळी आठच्या दरम्यान झाडावर बिबट्या आढळून आला तर रात्री नऊ च्या दरम्यान गायकवाड वस्तीवरील महेश गायकवाड यांच्या घराच्या पोर्चमधून दरवाज्यात हा बिबट्या पोहचला याठिकाणी एक वर्षाची मुलगी खेळत होती मात्र घरातील व्यक्तींनी या बिबट्याला हुसकून लावले त्यामुळे मुलीचे प्राण वाचले.या बिबट्याबाबत अगदी केंद्रीय सचिवांपासून , मुख्यमंत्री,आमदार असे कळविले आणि सूत्रे हालली. याठिकाणी बिबट्याची हालचाल पाहण्यासाठी तीन कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

सकाळी आठच्या दरम्यान झाडावर बसलेला बिबट्या कुंडलिक पाटील यांनी पाहिला. याचबरोबर दिवसात तीन वेळा पुन्हा या बिबट्या दिसला.रात्री नऊ च्या दरम्यान महेश गायकवाड यांच्या घराच्या पोर्चमधून हा बिबट्या दरवाज्याच्या फटीतून तोंड आत घालून घरात प्रवेश करण्याचा प्रयत्न करत होता.यावेळी राजनंदिनी महेश गायकवाड(वय १) ही बालिका तेथेच खेळत होती. यावेळी बाहेरून येणारे महेश यांनी बिबट्याला पाहिले.त्यांनी तीन चार वेळा हुसकावून लावण्याचा प्रयत्न केल्यावर हा बिबट्या निघून गेला. त्यामुळे या बालिकेचा प्राण वाचला.

या सर्व घटनांमुळे नागरिकांच्यात भीतीचे वातावरण पसरले आहे. कुंडलिक पाटील यांचे नातेवाईक केंद्रीय शिक्षण विभागाचे सचिव आनंदराव पाटील यांना नवी दिल्ली येथे कळवून बिबट्याचा बंदोबस्त होण्याबाबत सांगितले. याचदरम्यान आमदार सत्यजीत देशमुख हेही दिल्ली येथे होते. यामुळे सर्व सूत्रे हालली.तेथून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वनविभागास कळविले. यावेळी सकाळ पासून वनक्षेत्रपाल एकनाथ पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल अनिल वाजे, वनरक्षक दत्तात्रय शिंदे, सतीश कदम, सुभाष पाटील,



सरपंच प्रियांका पाटील,सचिन पाटील आदींनी संपूर्ण परिसराची पाहणी केली.तसेच तीन ठिकाणी ट्रॅप कॅमेरे बसविण्यात आले. आहेत.

दि.२३फेब्रुवारी २०२१ रोजी बिबट्याच्या हल्ल्यात ऊसतोड मजुराच्या मुलाचा सुफियान शमसुद्दीन शेख ( वय ११ महिने) याचा मृत्यू झाला होता.दुसऱ्या हल्ल्यात गणेश श्रीराम कंबोलकर हे जखमी झाले होते. तर, महेश गायकवाड यांच्या घराच्या पोर्चमधून एक वर्षांपूर्वी त्यांच्या कुत्र्यावर हल्ला करून मारले होते

# टेलिकॉम कंपनीच्या साहित्याची चोरी

**सातारा/प्रतिनिधी:-**

सुमारे दोन लाख रुपये किंमतीच्या टेलिकॉम कंपनीच्या साहित्याची चोरी केल्याप्रकरणी अज्ञात चोरट्यांवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १० ते १६ जून दरम्यान अमर लक्ष्मी चौक, नवीन एमआयडीसी येथील जाधव ट्रेडर्स दुकानाच्या गेटच्या आतमध्ये मोकळ्या प्लॉटमध्ये ठेवलेले जिओ टेलिकॉम कंपनीमध्ये लागणारे दोन लाख रुपये किंमतीचे साहित्य अज्ञात चोरट्याने चोरून नेले आहे. याबाबत सातारा शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली असून अधिक तपास पोलीस हवालदार चव्हाण करीत आहेत.

# वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य सुविधेची दिंडी

## एक दिंडी आरोग्य सुविधेची ! एक वारी समतेची..!

**इस्लामपूर/प्रतिनिधी:-**

गेली वीस वर्षे वारी समतेची या माध्यमातून विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्यावतीने चिंचणी ता. पंढरपूर येथे आषाढी एकादशी निमित्त येणाऱ्या वारकऱ्यांसाठी आरोग्य तपासणी करून मोफत औषधोपचार करण्यात येतो. बडवे हटाव व विठ्ठल रुक्माई मंदिर मुक्ती आंदोलनाच्या संकल्पनेतून वारी समतेची हा उपक्रम सुरू झाला. पिराची कुरोली पैकी चिंचणी ता. माळशिरस जि. सोलापूर येथे हे आरोग्य शिबिर ३ जुलै २०२५ रोजी आयोजित केले आहे. विठूमाऊलीच्या शब्द शिल्पालाच्या बाजूला हे शिबिर घेण्यात येणार आहे.

आरोग्य सेवेच्या या दिंडीमध्ये धर्म जाती पंथ भेदभाव विसरून वारकऱ्यांची सेवा केली जाते. प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित केले जातात. वारकऱ्यांना फराळाचे साहित्य व पाणीपुरवठा केला जातो. वारकऱ्यांसोबत नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी हा अनुभव घेतला जातो. मोहन अनपट, डॉ. जालिंदर कांबळे, डॉ अमितकुमार सूर्यवंशी डॉ. विलास कुमार, किरण मोहिते, डॉ. स्मृती गाडे, डॉ. प्रसाद पोतदार, डॉ. सौरभ पाटील हे आरोग्य तपासणी करणार आहेत. शिबिराचे नियोजन कॉम्रेड धनाजी गुरव, दीपक कोठावळे,बीजी पाटील काका, रणजीत चव्हाण, डॉ. राजेश दांडगे, उमेश कुरळपकर डॉ. राम घुले, जालिंदर घिगे, विशाल धस, बीपी पाटील, चंद्रशेखर क्षीरसागर, अजित हवलदार, प्रा. मिलिंद साळवे, प्रा. शंकर चव्हाण, विकी खेडकर, उमेश शेवाळे, विजय मांडके इत्यादी कार्यकर्ते शिबिर यशस्वी होण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. वरदायिनी माता तरुण मंडळ चिंचणी व ग्रामस्थ, संभाजी ब्रिगेड, नातं रक्ताचं परिवार, आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक ब्रिगेड, बळीराजा शेतकरी संघटना,शिवशंभू स्वराज्य प्रतिष्ठान व सर्व समविचारी पुरोगामी संघटनांच्या माध्यमातून हा उपक्रम राबविला जातो.

पंढरपूरच्या वाटेवरील हा महत्त्वाचा टप्पा मानला जातो. दरवर्षीच्या सातत्यपूर्ण शिबिर असल्याने हजारो वारकरी स्वतःच थांबून मोफत आरोग्य सुविधेचा लाभ घेत असतात. सध्याच्या काळात संपुर्ण देशामध्ये सलोखा, सहिष्णुता, संवाद, प्रेम यांची गरज असतानाचे हे शिबीर म्हणजे सेवा व समतेचे प्रतीक आहे. सामाजिक




संवेदना, महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक जाणीवा नव्या पिढीमध्ये समृद्ध व्हाव्यात ऐतिहासिक दिंड्यांची सेवा व्हावी हा सुद्धा उद्देश या पाठीमागे आहे. प्रेमाच्या, उत्साहाच्या आणि सेवेच्या या सोहळ्यात शिराळा व इस्लामपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, मालती कन्या महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सहभागी होत असतात. आरोग्यविषयक शिबीरात औषधाची गरज मोठ्या प्रमाणात लागते. आपल्या परीने आर्थिक सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# महाराष्ट्र शासन
# जलसंपदा विभाग

**विषय:शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अभियंता (स्थापत्य) यांची पदे करारपध्दतीने भरणे बाबत**

संदर्भ :१) महाराष्ट्र शासन सा.प्र.वि. निर्णय क्र. संकीर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३ दि.१७/१२/२०१६
२) महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्र. पदनि-२०१८/प्र.क्र.११३/आ.पु.क. दिनांक ११/१२/२०१८
३) महाराष्ट्र शासन सा.प्र.वि. निर्णय क्र.संकीर्ण २७१५/प्र.क्र.१००/ (भाग-१) १३ दि.०८/०९/२०२३
४) मं.का.पत्र जा.क्र.पु पा मं/ आ-१/३३८५ दिनांक ०६/०६/२०२५

विषयांकित प्रकरणी नीरा उजवा कालवा विभाग फलटण चे अखत्यारीमधील नीरा उजवा कालव्याचे लाभक्षेत्रांतर्गत येणाऱ्या शाखा कार्यालयामधील शाखाधिकारी पदी हंगाम निहाय सिंचन आवर्तन, सिंचन व्यवस्थापन अनुषंगाने इतर कामकाज व धरण व्यवस्थापन कामासाठी करारपध्दतीने नियुक्तीसाठी सेवानिवृत्त अभियंता यांचेकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

विहित नमून्यातील अर्ज खाली नमूद ठिकाणी व्यक्तीशः किंवा टपालाने दिनांक ०२/०७/२०२५ रोजी सायं. ०५.०० पर्यंत कार्यालयीन वेळेत (शासकीय सुट्ट्या वगळून) स्विकारणेत येतील.

सेवाकरार पध्दतीने विवक्षीत कामासाठी सेवानिवृत्त अभियंता पदे भरावयाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | करारपध्दतीने भरावयाची पदसंख्या |
|---|---|---|
| १ | शाखा अभियंता (स्थापत्य) | ४ |

(अ) पदासाठी अर्हता व अनुभव
१. उमेदवार शासकीय / निमशासकीय सेवेतून शाखा अभियंता (स्थापत्य) पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा.
२. विवक्षित कामासाठी करार पध्दतीने नियुक्त करावयाचा संवर्गीय अधिकारी शारिरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टिने सक्षम असावा तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.
३. करारपध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अभियंता यांचेविरुध्द कोणतीही शिक्षा झालेली नसावी. याबाबत अभियंता ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले आहे त्या संबधीत कार्यालयाकडून तसे प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे.
४. सद्यस्थितीमध्ये कोठे काम करीत असेल तर त्याचा तपशिल प्रमाणपत्रासह
(ब) वयोमर्यादेची अर्हता
१. अर्ज करणाऱ्याने सेवानिवृत्त अधिकारी / अभियंता यांची कमाल वयोमर्यादा ही ६५ वर्षापेक्षा अधिक नसावी.
(क) करारपध्दतीने करावयाच्या नियुक्तीबाबत अटी व शर्ती
१. सदरची नियुक्ती जास्तीत जास्त १ (एक) वर्षासाठी देण्यात येईल. कामाचे आवश्यकतेनुसार संबधीतांनी करार कालावधीत केलेल्या कामाचे मूल्यांकन करुन १ वर्षाकरीता मुदतवाढ देता येईल. अशी मुदतवाढ जास्तीतजास्त तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.
२. नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांना नियुक्तीच्यावेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकरण मुल्य विचारात न घेता त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल आणि एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीतजास्त ३ वर्षे) कायम राहील
३. पारिश्रमिक रकमेची गणना करणेकामी सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेले एकूण वेतन व आता मिळात असलेले एकूण निवृत्तीवेतन या संबंधातील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.
४. सदर नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतांस शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत सामावून घेणेबाबत वा नियमित सेवेत इतर कोणताही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.
५. सदर नियुक्त अधिकारी/ कर्मचारी यांना दिनांक १७/२/२०१६ व वेळोवेळी प्रचलित शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.
६. सदर नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांनी नियुक्तीनंतर विवक्षीत काम पूर्ण करण्याची जबाबदारी राहील व तसे बंधपत्र / हमीपत्र रु.५००/- चे नोंदणीकृत स्टॅम्पपेपरवर नियुक्तीच्या वेळी देणे आवश्यक राहील. तसेच सदर बंधपत्र / हमीपत्र यात करारपध्दतीने नियुक्ती देताना शासनाने व विभागाने निश्चीत केलेल्या अटी व शर्ती मान्य असलेबाबत तसेच सेवेत नियमित करणेबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काबाबत मागणी करण्यात येणार नाही याचा समावेश करुन सदर अटी व शर्ती मान्य असलेबाबत उल्लेख करारात करणेत यावा.
७. सदर नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा मुदतपुर्व समाप्त करुणबाबतचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना आहेत.
८. करार तत्वावर नियुक्ती अधिकारी/कर्मचारी त्याचेवर सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.
९. सदर नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांनी Conflict of interest जाहीर करणे आवश्यक राहील.
१०. आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना निवृत्तीवेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिकभत्ता अनुज्ञेय राहील.
११. सदर नियुक्ती अधिकारी/कर्मचारी यांनी कामाचे अनुषंगाने प्राप्त होणारी कागदपत्रे / माहिती व इतर आधर सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.
१२. सदर नियुक्त अधिकारी / कर्मचारी शासकीय निवासस्थानात रहात असलेस त्याचे मासिक पारिश्रमिक मधून अनुज्ञप्ती शुक्ल वसूल करण्यात येईल.
१३. नियुक्ती दिलेल्या पदी नियमित अधिकारी यांची नियुक्ती होताच सेवा आपोआप संपुष्टात येणार आहे.
१४. वरीलपैकी एका जरी अटीची पूर्तता होत नसलेस अर्जदार यांचा अर्ज अपात्र ठरवणेत येईल. तसेच याबाबत संबधीतांना काहीही कळविले जाणर नाही व कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची सर्व अर्जदारांनी नोंद घ्यावी.
(ड) आवश्यक महत्वाच्या सूचना
१. अर्ज पाठविण्याचा पत्ता कार्यकारी अभियंता, नीरा उजवा कालवा विभाग फलटण, अधिकारगृह फलटण
२. सोबतचे विहित नमुन्यामध्ये अर्जासोबत २२ से.मी. x १२ से. मी. आकाराचे स्वतःचे नाव व पत्त्यासह पोष्टाचे रुपये १० + २ रु.चे तीकीट लावलेला लिफाफा सह अर्ज सादर करणेचा आहे.
३. उमेदवारांनी आपले अर्ज समक्ष किंवा पोष्टाव्दारे वर नमूद पत्त्यावर दिनांक ०२ / ०७ / २०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत पोहोचतील अशा बेताने पाठवावेत त्यानंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाची दखल घेतली जाणार नाही
४. वयाबाबतच्या पुराव्यादाखल जन्मतारखेचा दाखला/ शाळा सोडलेचा दाखला/ सेवापुस्तकाचे पहिल्या ४ पानाची प्रत इ. बाबत साक्षंकित सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे. अन्यथः अर्ज आपोआप अपात्र ठरेल.
५. सदरचे भरती प्रक्रियेत पदांचे फेरबदल तसेच संपूण भरती प्रक्रिया स्थगित अथवा रदद करणेचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहेत.

**सही/-**
**(शि.दि.जाधव)**
**कार्यकारी अभियंता,**
**नीरा उजवा कालवा विभाग,**
**फलटण**

## महाराष्ट्र शासन
## विहित नमुन्यातील अर्ज

पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे अंतर्गत नीरा उजवा कालवा विभागामधील वीरधरण शाखा येथे सवानिवृत्त अभियंता यांची नेमणूक करारपध्दतीने घेणेबाबतचा अर्ज

पासपोर्ट सोईज फोटो अलिकडील काळातील

प्रति,
मा. कार्यकारी अभियंता,
नीरा उजवा कालवा विभाग,
अधिकार गृह (जूने कोर्ट)
फलटण - ४१५५२३

१. अर्जदाराचे संपूर्ण नांव :
२. कायमचा (पत्रव्यवहाराचा) पत्ता मोबाईल क्रमांक व ई-मेल सह :
३. जन्मतारीख (दाखला जोडणे आवश्यक) :
४. सेवानिवृत्ती दिनांक व पद :
५. ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले त्याचे नांव (विभाग, उपविभाग) :
६. शारिरीक क्षमता (सक्षम अधिकाऱ्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र) : :
७.सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेले वेतन व महागाईभत्ता (वेतनाचा दाखला जोडावा) :
८.महालेखाकार कार्यालयाकडून मंजूर निवृत्तीवेतन :
९.मिळत असलेले निवृत्तीवेतन (महागाई भत्तासह) :
१०. सद्यस्थितीत कुठे काम करीत असल्यास त्याचा तपशिल (प्रमाणपत्रासह) :

मला पूर्णपणे माहित आहे की, सिंचन व्यवस्थापनाचे विवक्षीत कामासाठी जलसंपदा विभागातील गट ब (राजपत्रितत/ अराजपत्रित) संवर्गातून सेवानिवृत्त अभियंता यांच्या सेवा घेण्याकरीता करारपध्दतीने नियुक्ती करणेत येणार आहे, सदर पदे क्षेत्रिय कामासाठी हंगामनिहाय आहेत व कामाची व्याप्ती प्रमाणे कमी/अधिक करण्यात येतील कामाच्या निकडीनुसार कोणत्याही तालुक्यात माझी काम करणेची तयारी आहे. तसेच उपरोक्त प्रमाणे नियुक्ती देण्यात आल्यास मला कोणतेही प्रशासकीय व वित्तीय अधिकार राहणार नाहीत याची मला जाणीव आहे. तसेच प्रचलित शासकीय नियमातील अटी व शर्ती तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियमांचे काटेकोरपणे पालन करणेबाबत हमी देत आहे.

तसेच मी सत्यप्रतिज्ञेवर सत्य कथन करतो/ करते की माझ्या माहितीप्रमाणे वर दिलेला तपशील सत्य व अचूक आहे. यामध्ये काही चुकीची माहिती आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी पूर्व सूचनेशिवाय रद्द होईल व मी शिक्षेस पात्र ठरेन याची मला पुर्ण जाणीव आहे.

**ठिकाण:**
**दिनांक:**

**सही/-**
**(शि.दि.जाधव)**
**कार्यकारी अभियंता,**
**नीरा उजवा कालवा विभाग,**
**फलटण**

**अर्जदाराची स्वाक्षरी व पूर्ण नाव**

विमाका/पुणे/जाहि/५५/२०२५-२६

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर उत्साहात

## शाळगाव मंडलातील ग्रामस्थांचा शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**कडेगाव/प्रतिनिधी:-**

कडेगाव तालुक्यातील शाळगाव मंडळातील गावांसाठी दि. २० जून रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर जिल्हाधिकारी सांगली यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आले. उपविभागीय अधिकारी रणजीत भोसले व तहसीलदार कडेगांव यांच्या विशेष प्रयत्नांनी तालुक्यातील दुसरे समाधान शिबिर आयोजित केले होते.



शिबिराचे प्रमुख पाहुणे म्हणून गटविकास अधिकारी प्रशांत राऊत, नायब तहसीलदार श्रीमती वैष्णवी पुजारी, पुरवठा निरीक्षक सुनील झाल्टे यांची विशेष उपस्थिती लाभली. तसेच तहसील कार्यालयातील संजय गांधी विभाग, पुरवठा विभाग, सेतू कार्यालय व महसूल विभाग उपस्थित होता. शाळगाव मंडळातील सर्व गावांचे ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी शाळगाव यांच्या सहभागाने मेळाव्यास उपस्थित होते.

यावेळी शाळगाव येथे विठ्ठल रुक्मिणी मंदिरात सकाळी ११ वाजता शिबिरास सुरुवात झाली. त्यांच्या पुढाकारामुळे अनेक नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळाला. यामध्ये वृद्धापकाळ, विधवा, अपंग योजना, उत्पन्न दाखले, जात प्रमाणपत्र, आधार लिंक आदी विविध सेवांचा समावेश होता. गावातील नागरिकांनी शिबिरास उत्तम प्रतिसाद दिला. यावेळी महसूल विभागाच्या श्रीमती पुजारी मॅडम, तसेच गटविकास अधिकारी राऊत यांनी उपस्थित ग्रामस्थांशी संवाद साधून योजनांची माहिती दिली.

शिबिरात एकूण ८१३ विविध प्रकारचे दाखले यामध्ये उत्पन्नाचे दाखले, कुणबी दाखले वाटप केले गेले. तसेच विविध योजनांचे एकूण १९७ प्रस्ताव दाखले झाले अर्ज दाखल झाले. शाळगाव मंडळातील ग्रामस्थांनी शिबिरास उत्स्फूर्तपणे उपस्थित राहून भरघोस प्रतिसाद दिला. गावातील मान्यवरांनी सदर कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सर्व विभागांचे व उपस्थित अधिकारी कर्मचाऱ्यांचे विशेष आभार मानले.

# कडेगाव पूर्व भाग सोसायटीच्या स्वीकृत संचालकपदी रघुनाथ तडसरे, निखिल शहा बिनविरोध

**कडेगाव/प्रतिनिधी:-**

कडेगाव येथील पूर्व भाग सर्व सेवा सोसायटीच्या स्वीकृत संचालकपदी भाजपाचे रघुनाथ तडसरे व काँग्रेसचे निखिल शहा यांची बिनविरोध निवड करण्यात आली. संस्थेच्या सभागृहामध्ये चेअरमन बबन माळी, व्हा. चेअरमन राजेंद्र दोडके व सचिव प्रदीप मोहिते यांच्यासह संचालक मंडळ व सभासदांच्या प्रमुख उपस्थितीत ही निवडणूक प्रक्रिया पार पडली. दोन्ही स्वीकृत संचालकपदासाठी रघुनाथ तडसरे व निखिल शहा यांचे अर्ज आल्याने ही निवडणूक बिनविरोध झाली.

निवडीनंतर कडेगावचे नगराध्यक्ष धनंजय देशमुख, उपनगराध्यक्ष पै. अमोल डांगे, ज्येष्ठ नेते सुरेश निर्मळ, शशिकांत रासकर, विजय गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत नूतन स्वीकृत संचालकांचा सत्कार संस्थेच्या सभागृहात करण्यात आला.



**कडेगाव : नूतन संचालकांचा सत्कार करताना नगराध्यक्ष धनंजय देशमुख, उपनगराध्यक्ष पै. अमोल डांगे, सुरेश निर्मळ, शशिकांत रासकर व मान्यवर.**

यावेळी संचालक अरुण सगरे, पिरम्मदमहंमद आतार, बजरंग माळी, सागर माळी, सर्जेराव रासकर, कृष्णत शिंदे, जावेद पटेल, रघुनाथ गायकवाड, कृष्णाबाई माळी, सुनंदा जाधव, राजेंद्र दोडके, आकाश धर्मे, गजानन माळी, दत्तात्रय भोसले, राजेश शहा, श्रीजय देशमुख, महेश देशमुख, नंदू राजपूत, प्रदीप पुजारी, संजय तडसरे, सुहास कराडकर, राजमहंमद बागवान, नितल शहा यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# ट्रकखाली सापडल्याने महिला गंभीर जखमी

**कराड/प्रतिनिधी:-**

मलकापूर फाटा (कराड) येथे पुणे-बंगळूरू आशियाई महामार्ग ओलांडताना ट्रकखाली सापडल्याने एक वृद्ध महिला गंभीर जखमी झाली. रविवार दि. २२ रोजी सकाळी १० वाजता हा अपघात घडला. जखमी महिला उपचारासाठी तात्काळ कृष्णा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

दरम्यान, अपघातानंतर ट्रक सोडून पळालेल्या चालकांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. याबाबत रात्री उशिरापर्यंत कराड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सूरू होते.

विमल सुरेश वाघ (वय ६०) रा. मलकापूर असे या अपघातात जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. तर विशाल सुरेश वाघ रा. पाटस, ता. दौंड असे पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या ट्रक चालकाचे नाव आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, रविवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास विमल वाघ या मलकापूर फाटा येथून महामार्ग ओलांडून महामार्गाच्या पश्चिम बाजूकडे निघाल्या होत्या. यावेळी सातारा बाजूकडून कोल्हापूरच्या दिशेने निघालेल्या ट्रकने विमल वाघ यांना धडक दिली. या अपघातात वाघ या ट्रकखाली सापडल्या. ट्रकची चाके त्यांच्या दोन्ही पायांवरून गेल्याने त्या गंभीर जखमी झाल्या. त्यांना तातडीने कृष्णा रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

**सा.बां. विभाग शासन निर्णय क्र.सीएटी २०१७/प्र.क्र.८/इमारती-२,दिनांक २७ सप्टेंबर, २०१८**

**संक्षिप्त ई-निविदा सूचना**
**महाराष्ट्र शासन,**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा**
**रेणूका पेट्रोल पंपाजवळ, पोवईनाका, सातारा, ४१५००१**

ई-मेल पत्ता satara.eemahapwd.gov.in — दूरध्वनी/फॅक्स क्रमांक: (०२१६२)-२३३७९२

## अल्पकालावधीची ई-निविदा सूचना क्र.१८ सन २०२५-२०२६

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा ४१५००१ (दूरध्वनी क्रमांक २३३७९२) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामांकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahajenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. कामांच्या अंदाजपत्रकीय दरांमध्ये GST समाविष्ठ नाही. कंत्राटदार यांनी त्यांचा देकार सुध्दा GST वगळून (समाविष्ठ न करता) द्यावयाचा आहे. कंत्राटदार यांना GST देयकाच्या रक्कमेवर देय दराने स्वतंत्रपणे अदा करण्यात येईल.

| ई निविदा काम क्रमांक | कामाचे नाव | कामाचो अंदाजित किंमत रू. लक्ष |
|---|---|---|
| १ | वडूज ता. खटाव येथे सार्वजनिक बांधकाम उपविभाग वडूज या कार्यालयाचे बांधकाम करणे ता. खटाव जि. सातारा | १४०.४७ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक २३/०६/२०२५ सकाळी १०.०० ते दिनांक ०९/०७/२०२५ संध्याकाळी १७.३० वाजेपर्यंत.
ई-निविदा उघडणे :- दिनांक ०३/०७/२०२५ सकाळी ११.०५ ते दिनांक ०४/०७/२०२५ संध्याकाळी १७.३० वाजेपर्यंत. (शक्य झाल्यास)

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
1. www.mahapwd.gov.in
2. https://mahatenders.gov.in
(सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल)
३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा यांचे कार्यालयातील सूचना फलक

जा.क्र. लेखा/जी-११७/४४१०/२०२५
कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग,
सातारा यांचे कार्यालय.
दिनांक. १३/०७/ २०२५.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,सातारा**

# प्रत्येक जिल्ह्यात ‘परशुराम भवन’ उभारणार

## आशिष दामले:ब्राह्मण समाजासाठी परशुराम महामंडळाच्या योजनांची प्रभावी करण्याच्या सूचना

**कराड/प्रतिनिधी : -**

परशुराम आर्थिक विकास महामंडळातर्फे ब्राह्मण समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ समाजाच्या प्रत्येक घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात ‘परशुराम भवन’ उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार कराडमध्येही परशुराम भवन उभारण्यात येईल, अशी माहिती महामंडळाचे अध्यक्ष आशिष दामले यांनी दिली.



अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या पश्चिम महाराष्ट्र विभागीय पदाधिकाऱ्यांची बैठक आणि नियुक्ती प्रदान सोहळा रविवारी (दि. २२) जून रोजी कराड येथे पार पडली. यानंतर येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश ब्राह्मण महासंघाच्या उपाध्यक्षा सौ. सोनल भोसेकर, माजी नगरसेवक घनश्याम पेंढारकर, मुकुंद चरेगावकर उपस्थित होते.

श्री दामले म्हणाले, ब्राह्मण समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी राज्य शासनाच्या माध्यमातून स्थापन करण्यात आलेल्या परशुराम आर्थिक विकास महामंडळातर्फे समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना राबवल्या जातात. या सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. यामध्ये प्रामुख्याने समाजातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण व परदेशी शिक्षणासाठी कर्ज, तसेच व्यावसायिक आणि महिला बचत गटांसाठी वित्तीय मदतीच्या योजनांचा समावेश असून त्याचा लाभ विद्यार्थ्यांना मिळत आहे.

ते म्हणाले, महामंडळाच्या माध्यमातून समाजातील विद्यार्थ्यांना भारतात शिक्षणासाठी १० लाख रुपये, तर परदेशी शिक्षणासाठी २० लाख रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे समाजातील युवकांना व्यवसायासाठी १५ लाख रुपयांपर्यंत वैयक्तिक कर्ज, गटांसाठी ५० लाखांपर्यंतचे गट कर्ज आणि महिला बचत गटांसाठी २० लाखांपर्यंतचे कर्ज दिले जाणार आहे.



प्रीतिसंगमावर स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण यांच्या समाधीस्थळी अभिवादन करताना परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आशिष दामले समवेत मुकुंद चरेगावकर, महाराष्ट्र प्रदेश ब्राह्मण महासंघाच्या उपाध्यक्षा सौ. सोनल भोसेकर, शिरीष पेंढारकर जयंत बेडेकर व इतर मान्यवर

तसेच महामंडळाच्या प्रभावी कामकाजासाठी आम्ही राज्य शासनाकडे ३०० कोटी रुपयांचा निधी मागितला आहे. या मागणीनुसार सध्या १० कोटी रुपयांचा प्राथमिक निधी शासनाने मंजूर केला असून उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी आवश्यकतेनुसार निधी पुरवण्याचे आश्वासन महामंडळाला दिले आहे. त्याचबरोबर ब्राह्मण समाजातील अचूक माहिती संकलित करण्यासाठी महामंडळाने गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स या संस्थेला पत्र पाठवले असून त्यांच्याकडून राज्यातील पौरोहित्य करणाऱ्या ब्राह्मणांची माहिती गोळा केली जाणार आहे. या डेटावर आधारित समाजाच्या गरजांनुसार योजना राबवणे सोपे होईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

### पारंपरिक व्यवसाय करणाऱ्यांना संधी

पौरोहित्य करणाऱ्यांसाठी एक वर्षाचा अभ्यासक्रम सुरू करून त्यांना शासकीय स्तरावर पदवी प्रमाणपत्र देता येईल का? याबाबतचा प्रस्तावही आम्ही तयार करत आहोत. यामुळे पारंपरिक व्यवसाय करणाऱ्यांना अधिक व्यावसायिक संधी उपलब्ध होतील, असेही श्री दामले यांनी यावेळी नमूद केले.

# वारकरी व भाविक यांची सर्वोच्च व्यवस्था करणार

**पंढरपूर/प्रतिनिधी:**



आषाढी सोहळ्यात पंढरपूर येथे सर्व पालख्या, दिंड्या, वारकरी व भाविक यांची सर्वोच्च व्यवस्था करणार महास्वच्छता अभियानात ४२ ठिकाणी अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवक व नागरिक यांनी स्वच्छता मोहीम राबवून बहुतांश पंढरपूर शहर स्वच्छ केले, सर्वांच्या कामांचे खूप कौतुक आहे आज या स्वच्छता अभियानातून १४८ टन कचरा गोळा करण्यात आला.

ग्रामविकास आणि पंचायत राज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना.जयकुमार गोरे यांच्या संकल्पनेतून पंढरपूर शहर महास्वच्छता अभियान २०२५ अंतर्गत एकाच वेळी सकाळी सात ते दहा या कालावधीत ४२ ठिकाणी महास्वच्छता मोहीम राबवून १४८ टन कचरा गोळा करण्यात आला. या मोहिमेत सोलापूर जिल्हा प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी, सामाजिक संस्थांचे स्वयंसेवक, विविध सामाजिक संघटना, पंढरपूर शहरातील नागरिक यांनी सक्रिय सहभाग घेऊन ही विठुरायाची नगरी बहुतांश स्वच्छ केली आहे. या मोहिमेतून पंढरपूर शहर व येथे येणाऱ्या हजारो भाविकांच्या घरोघरी स्वच्छतेचा संदेश पोहोचविण्याचे क्रांतिकारी कार्य घडले असल्याचे प्रतिपादन राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

यावेळी आ. प्रशांत परिचारक,आ.समाधान आवताडे,आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. देवेंद्र कोठे,जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, सोलापूर महापालिकेचे आयुक्त सचिन ओम्बासे,पंढरपूरचे उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके,नगरपालिका प्रशासन अधिकारी वीणा पवार, पंढरपूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे , भाजप किसान मोर्चाचे प्रदेश सचिव माऊली हळणवर, जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, सरचिटणीस गणेश चिवटे,पंढरपूर मंडलअध्यक्ष सुभाष मस्के, शहराध्यक्ष लाला पानकर,करकंब मंडलअध्यक्ष हर्षल कदम, बाळासाहेब एरंडे,उल्हास धायगुडे माळशिरस, करमाळा, बार्शी माढा विभागाचे भाजपचे मंडल अध्यक्ष,यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख व मान्यवर उपस्थित होते.

# वाहतूक व्यावसायिकांचा १ जुलै रोजी चक्काजामचा इशारा

## परिवहन व पोलीस विभागाच्या त्रासाला कंटाळून आंदोलनाचा पवित्र

**सातारा/प्रतिनिधी:**

महाराष्ट्रातील वाहतूक व्यावसायिकांनी मोटार परिवहन विभाग व पोलीस यांच्या त्रासाच्या विरोधात एकत्र येऊन चक्काजाम आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे एक जुलै रोजी हे चक्काजाम आंदोलन सुरू होणार आहे राज्य वाहतूक संघटनेची बैठक मुंबई वाशी येथील माथाडी भवन येथे आयोजित करण्यात आली होती त्यावेळी बैठकीत हा निर्णय घेण्यात आला

या बैठकीला ऑल इंडिया मोटर ट्रान्सपोर्ट काँग्रेसचे माजी अध्यक्ष मलकित सिंग बल अमृतलाल मदान महाराष्ट्र वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रकाश गवळी वाशी असोसिएशनचे अध्यक्ष विठ्ठल शेठ धुमाळ वाहतूक असोसिएशन महासंघाचे परशुराम कटके ठाणे असोसिएशनचे अध्यक्ष विजय यादव पुणे ट्रान्सपोर्ट असोसिएशनचे अध्यक्ष राजेंद्र राजपूत पिंपरी चिंचवड बस असोसिएशनचे अध्यक्ष बाळासाहेब बोराटे व बीजेपी चे अध्यक्ष सुरेश खोसला इत्यादी मान्यवर या बैठकीला उपस्थित होते या बैठकीमध्ये परिवहन विभाग व पोलीस यांचेकडून वारंवार नियमावर बोट ठेवून मालवाहतूक चालकांना उपद्रव केला जातो

ऑनलाईन दंड करणे क्लीनर नसल्यास दंड करणे पार्किंग व्यवस्था नसल्यासट्रकच्या संदर्भामध्ये दंडाची भूमिका घेणे यामुळे वाहतूक चालकांना प्रचंड मनस्ताप सोसावा लागतोवाहतूक चालकांना होणारा ऑनलाइन दंड हा काही हजारांमध्ये असतो वाहतूक चालक हे कामाच्या निमित्ताने घरापासून दूर असतात तसेच ज्या राज्यात अथवा ज्या ठिकाणी ते असतात तेथे मदत यंत्रणा तातडीने उपलब्ध होणे शक्य नसते .त्यामुळे अशा दंडाच्या विरोधामध्ये वाहतूक चालकांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे एक जुलै रोजी रात्री बारा वाजल्यापासून हे आंदोलन सुरू होणार असल्याचे वाहतूक महासंघाचे अध्यक्ष प्रकाश गवळी व सचिव धनंजय कुलकर्णी यांनी पत्रकाद्वारे कळवले आहे

# दिवशी बुद्रुकचा स्वाभिमान प्रत्येकानेच घ्यावा


## सत्यजितसिंह पाटणकर:सोसायटी नवनिर्वाचित संचालकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार

**मल्हारपेठ/प्रतिनिधी : -**

दिवशी बुद्रुक विविध कार्यकारी सेवा सोसायटी निवडणुकीत कामगार नेते सुजित पाटील यांच्या नेतृत्वाखाली स्थानिकांनी देसाई गटाच्या विरोधी पॅनलच्या तब्बल १२/० असा दारून पराभव करत पाटणचा स्वाभिमान पुन्हा एकदा सिद्ध करून दिला आहे. येणाऱ्या सहकार, राजकीय व अन्य सर्वच्या सर्व निवडणुकात मतदारांनी हाच स्वाभिमान कायम राखत जुने चांगले दिवस आणण्यासाठी स्वाभिमानी पाटण विधानसभा मतदारसंघ बनवूया. यासाठी माझ्यासह तुम्हा सर्वांचे प्रयत्न शुभेच्छा, आशीर्वाद तितकेच महत्त्वाचे असल्याचे मत भाजपाचे पाटण विधानसभा मतदारसंघाचे नेते सत्यजितसिंह पाटणकर यांनी व्यक्त केले.

दिवशी बुद्रुक (ता. पाटण) येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या निवडणुकीत टाटा कंपनीचे कामगार नेते सुजित पाटील यांच्या नेतृत्वाखाली भाजपाच्या पावणाई देवी शेतकरी ग्रामविकास पॅनलच्या सर्वच्या सर्व उमेदवारांनी विजय मिळवला. या विजयी उमेदवारांच्या सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी ज्येष्ठ नेते हिंदुराव पाटील, युवा उद्योजक याज्ञसेन पाटणकर, भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष चिन्मय कुलकर्णी, जिल्हा सरचिटणीस संतोष कणसे, विधानसभा प्रचार प्रमुख विक्रमबाबा पाटणकर, तालुका प्रमुख नंदकुमार सुर्वे आदींची प्रमुख उपस्थिती होती.



दिवशी बुद्रुक : नवनिर्वाचित संचालक मंडळाचा सत्कार करताना सत्यजितसिंह पाटणकर, याज्ञसेन पाटणकर, हिंदुराव पाटील आदी मान्यवर.

श्री. पाटणकर म्हणाले, पाटण मतदारसंघाला आदर्श राजकीय नैतिकता, संस्काराची पार्श्वभूमी आहे. मधल्या काळात या सर्व बाजू बाजूला पडल्याने मग हुकूमशाही, दडपशाही, दबाव तंत्राने निवडणुका जिंकणे एवढाच कार्यक्रम विरोधकांनी हातात घेतला होता. पैशाच्या जोरावर निवडणुका होऊ लागल्याने मग प्रामाणिक निष्ठावंत कार्यकर्ते बाजूला पडू लागले आहेत. मात्र आता आपल्या पाठीमागे राज्य व केंद्रामधली भाजपाची सर्वात मोठी ताकद आहे. यापुढे स्थानिकांनी कोणत्याही आमिषाला, दबावाला बळी न पडता स्वतंत्रपणे आपल्या मताचा हक्क बजवावा आणि पुन्हा एकदा पाटण विधानसभा मतदारसंघ हा आदर्श, सुसंस्कारी व दर्जेदार कायमस्वरूपी विकास काम करणारा बनवूया. यासाठी आपण सर्वांनी निश्चितच प्रयत्नशील रहावे आपल्या पाठीशी पक्षासोबतच आमची सर्वतोपरी ताकत उभी करू, असे आश्वासनही यावेळी त्यांनी दिले.

यावेळी माजी पंचायत समिती सदस्य नानासो सावंत, गणेश यादव, रविराज पाटील, चंद्रकांत भिसे, दिनकरराव गाडगे आदी भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते, दिवशी बुद्रुक गावचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

# अर्जुन कोळी यांची मिपा औरंगाबादच्या कोअर कमेटी सदस्यपदी निवड

**कराड/प्रतिनिधी : -**

शैक्षणिक क्षेत्रात दीर्घकाळ केलेल्या भरीव कार्याची दखल घेत, पीएम श्री. कराड नगरपरिषद शाळा क्रमांक ३ चे माजी मुख्याध्यापक, तसेच महाराष्ट्र राज्य नगरपालिका व महानगरपालिका शिक्षक संघाचे राज्य अध्यक्ष मा. अर्जुन कोळी यांची महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद यांच्या कोअर कमेटी सदस्यपदी शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी निवड करण्यात आली आहे.



मिपा संस्था ही नवी दिल्ली येथील नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर एज्युकेशनल प्लॅनिंग ॲटण्ड ॲपडमिनिस्ट्रेशन (निपा) या शैक्षणिक धोरणनिर्मिती संस्थेच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असून, शालेय व्यवस्थापन, नेतृत्व विकास आणि प्रशासनाच्या विविध उपक्रमांची अंमलबजावणी राज्यभरात करते. मिपाची कोअर कमेटी ही राज्यभरातील निवडक तज्ज्ञ आणि अनुभवी शिक्षणतज्ज्ञांचा समावेश असलेली सल्लागार मंडळ आहे, जी धोरणात्मक निर्णय, शैक्षणिक उपक्रमांची आखणी व अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन करते.

अर्जुन कोळी यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान अत्यंत महत्त्वाचे राहिले आहे. त्यांनी शिक्षक म्हणून आणि नंतर मुख्याध्यापक या पदावर कार्यरत असताना शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी अनेक उपक्रम राबवले. त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेने राज्यस्तरीय विविध स्पर्धांमध्ये यश मिळवले असून, शिक्षक संघटनात्मक कार्यामध्येही त्यांचे योगदान वाखाणण्याजोगे आहे. या निवडीनंतर राज्यभरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विविध शिक्षक संघटना, सहकारी, माजी विद्यार्थी आणि पालक वर्गाने त्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. या नव्या जबाबदारीच्या माध्यमातून कोळी यांचे अनुभव व दृष्टीकोन राज्यातील शाळांच्या प्रगतीसाठी उपयुक्त ठरणार, असा विश्वास शिक्षणवर्तुळातून व्यक्त करण्यात येत आहे.

# राष्ट्रवादी आध्यात्मिक व वारकरी आघाडीतर्फे बुधवारी वाल्हे मुक्कामी एक लाख वारकऱ्यांसाठी महाप्रसाद

**पुणे/प्रतिनिधी:**

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात राष्ट्रवादी आध्यात्मिक व वारकरी आघाडीतर्फे एक लाख वारकऱ्यांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले आहे. बुधवार, दि. २५ जून २०२५ रोजी माऊलींची पालखी वाल्हे येथे मुक्कामास असणार आहे. वाल्हे मुक्कामी येणाऱ्या वारकऱ्यांसाठी आषाढी वारीनिमित्त महाभोजन व्यवस्था केली जाणार आहे.



महाप्रसाद म्हणून चपाती, भाजी, वरणभात, गोड पदार्थ शिरा-बुंदी समाविष्ट आहे, अशी माहिती राष्ट्रवादी आध्यात्मिक व वारकरी आघाडीचे राज्यप्रमुख हभप विठ्ठलआबा मोरे यांनी दिली आहे.

हभप विठ्ठलआबा मोरे म्हणाले, माउलींचा पालखी सोहळा देशभरातून येणाऱ्या वारकऱ्यांसाठी भक्तियोग असतो. भक्तिरसात न्हाऊन निघणाऱ्या, पायी चालत पंढरीच्या दिशेने एकेक पाऊल टाकणाऱ्या वारकरी बंधू-भगिनींसाठी यंदा महाप्रसादाचे आयोजन केले आहे. सुमारे एक लाख वारकऱ्यांना सकस, ताजे व पौष्टिक भोजन देण्यासाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी, स्वयंसेवक मनोभावे तयारी करत आहेत. वाल्हे येथील पालखी तळावर ही व्यवस्था उपलब्ध होणार असून, काटेकोरपणे नियोजन केले जात आहे.

# सोलापूर जिल्हा हादरला; मोहोळमध्ये अल्पवयीन मुलीवर वडीलानेच केला अत्याचार

**सोलापूर/प्रतिनिधी:**

एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर स्वतः वडीलांनीच अत्याचार केल्याची घटना घडली असून ही घटना मोहोळ तालुक्यातील आहे.

अत्याचारित मुलगी रात्री ८.३० ला मंगळवेढा पोलीस स्टेशनमध्ये येवून घटना कथन करताच मंगळवेढा पोलीसांनी तत्परतेने या घटनेची दखल घेवून फिर्याद दाखल केली व शून्य क्रमांकाने कामती पोलीस स्टेशनला वर्ग करून सदर पिडीत मुलीला कामती येथे रात्री शासकीय वाहनाने पोहच केल्याने त्या पिडितेला न्याय मिळाल्याने मंगळवेढा पोलीसांचे कामकाजाबाबत कौतुक होत आहे.



या घटनेची हकीकत अशी की, सदर पिडीत मुलगी ही मोहोळ तालुक्याच्या ग्रामीण भागात राहावयास असून हिच्या आईचे वडीलांबरोबर पटत नसल्यामुळे ती वडीलापासून गेली १० वर्षापासून विभक्त माहेरी मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागात रहावयास आहे.

सायं.५.३० वाजता यातील पिडीत मुलीचे वडील घरी होते तर तिचे आजोबा एका कारखान्यात कामावर गेले होते. ही संधी साधून आरोपी वडीलाने मुलीस नवीन तुला ड्रेस आणला आहे, तो मला घालून दाखव असे नाटक केले. त्या पिडीत मुलीने नवीन कपडे घातले नाहीत.

आरोपी तथा वडीलाने घराच्या दाराला कडी लावून आंथरून टाकून हात पाय दाबण्याचा बहाणा केला. त्यावेळी पिडीतेने वडीलाचा शब्द प्रमाणित मानून पाय दाबण्याची सेवा करत असताना आरोपीने तिच्या हाताला धरून जवळ घेतले व अंगावरील कपडे काढून जबरदस्तीने अल्पवयीन मुलीशी शारीरिक संबंध ठेवले.

यावेळी पिडीतेने स्वतःची सुटका करून घेण्यासाठी आरोपीच्या हाताला चावा घेतला. मात्र पिडीत मुलीपेक्षा आरोपीची ताकद जास्त असल्याने त्याने तिला सोडले नाही. तदनंतर या घटनेबाबत तु कोणाला काही सांगू नकोस असा दमही दिला. यावेळी पिडीतेने आरोपीस जोरात ढकलून सुटका करून घेतली व कपडे घालून दाराची कडी काढून बाहेर पळत येवून बाहेरून दरवाजाला कडी लावली. तदनंतर पिडीतेने मदतीसाठी बाहेर हाका मारल्या मात्र तिच्या मदतीला कोणीही धावून आले नाही.

या दरम्यान पिडीता बाहेरच अंधारात बसून राहिली. रात्री ९ वाजता तिचे आजोबा कामावरून घरी आले. पिडीतेने मंगळवेढयाच्या ग्रामीण भागात राहात असलेल्या आईला फोन करून घडलेली हकीकत कथन केली. यावेळी आईने तिला मंगळवेढयाकडे येण्याचा सल्ला दिला. सायं.६ वाजता ती तिथून मिळेल त्या वाहनाने मंगळवेढा बस स्टँडवर रात्री ८ वाजता आली. त्यावेळी आई पण येथे पोहचली होती. पिडीत मुलगी व तिची आई पोलीस स्टेशनला येवून सदर घटनेची हकीकत पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांना कथन केली.

या घटनेची पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांना माहिती देताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली डी.वाय.एस.पी. विक्रांत गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक नागेश बनकर, निर्भया पथकाच्या पोलीस उपनिरीक्षक स्नेहल चव्हाण, पोलिस उपनिरीक्षक विजय पिसे आदिंच्या पथकाने घटनेचे गांभीर्य ओळखून तात्काळ मंगळवेढा पोलीस ठाण्यात वडीलाविरूद्ध अत्याचाराचा गुन्हा दाखल केला.

तसेच कामती पोलीस स्टेशनच्या पोलीस अधिकार्याशी संपर्क साधून आरोपीला ताब्यात घेण्याच्या सुचना करून सदर गुन्हा कामती पोलीस स्टेशनला वर्ग केला. रात्रीची वेळ लक्षात घेवून पोलीस पथकाने पिडीत मुलीची सुरक्षितता अबाधित राहण्यासाठी शासकीय पोलीस गाडीने कामती येथे पोहच करण्यात आले. दरम्यान मंगळवेढा पोलीसानी घटनेचे गांभीर्य ओळखून तत्परतेने केलेल्या कारवाईबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# सुभीत आयआयटी अँड मेडिकल अकॅडमीच्या विद्यार्थ्यांचे जेईई आणि नीट परीक्षेत सुयश

## सहा विद्यार्थी गुणवत्ता यादीत; पाच वर्षांपासून यशाचा चढता आलेख कायम: यादव

**कराड/प्रतिनिधी : -**

येथील सुभीत आयआयटी अँड मेडिकल अकॅडमी, शिवाजीनगर हाऊसिंग सोसायटी, कराडच्या विद्यार्थ्यांनी जेईई आणि नीट परीक्षा २०२५ मध्ये सुयश संपादन केले. या अकॅडमीने आपल्या पाच वर्षांच्या वाटचालीत यशाचा चढता आलेख कायम ठेवला असून हे यश अकॅडमीच्या गुणवत्तेचे प्रतीक असल्याचे मत अकॅडमीचे संचालक सुभीत यादव यांनी व्यक्त केले.



वैद्यकीय शिक्षण अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेण्यासाठी राष्ट्रीय परीक्षा एजेंसीच्या माध्यमातून नीट यूजी (NEET - UG) परीक्षा घेतली जाते. देशभरासह परदेशातील परीक्षा केंद्रांवर ४ मे २०२५ रोजी ही परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला असून यामध्ये नीट परीक्षा क्रॅक करण्यामध्ये नावलौकिक असलेल्या कराड येथील सुभीत आयआयटी अँड मेडिकल अकॅडमीच्या तब्बल सहा विद्यार्थ्यांनी सुयश मिळवले आहे.

यामध्ये सुभीत अकॅडमीची विद्यार्थिनी आंचल ओसवाल हिने नीट परीक्षेत ७२० पैकी ५५७ गुण मिळवून सुयश मिळवले. तर सायली शेलार हिने ५०८ गुण, अफान बागवानने ५०२ गुण, हर्षिता लखापती हिने ४४४ गुण, कृष्णा महेश राऊत याने ३९४ गुण, तसेच पायल शिंदे हिने ३४० गुण मिळवले. तसेच जेईई डव्हान्स परीक्षेत आर्यन पवार या विद्यार्थ्याने १११ गुण मिळवत संपूर्ण देशात २०९७ वा क्रमांक मिळवला आहे. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या सुयशाबद्दल अकॅडमीचे संचालक सुभीत यादव यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कराड शहरात गेल्या पाच वर्षांपासून सुरू असलेल्या सुभीत आयआयटी अँड मेडिकल अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी प्रत्येक वर्षी उल्लेखनीय यश मिळवले आहे. ’जेईई आणि नीट’साठी प्रसिद्ध असलेल्या या अकॅडमीमध्ये १ जुलैपासून २०२६ साठी रिपीटर बॅच सुरू करण्यात येणार असून या ठिकाणी एका बॅचसाठी केवळ २० विद्यार्थ्यांना मर्यादित प्रवेश दिला जातो. अकॅडमीत प्रत्येक विद्यार्थ्याला उत्कृष्ट तयारीसाठी मार्गदर्शन, अभ्यास साहित्य, दैनंदिन सराव प्रश्न, जेईई आणि नीट परीक्षेसाठी तज्ज्ञ शिक्षकांकडून मार्गदर्शन केले जाते. त्यामुळे जेईई आणि नीट प्रवेश प्रक्रियेसाठी प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आजच आपला प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन अकॅडमीचे संचालक सुभीत यादव यांनी केले आहे.


### गुणवंत विद्यार्थ्यांचा लवकरच होणार गौरव

जेईई आणि नीट परीक्षेमध्ये सुभीत आयआयटी अँड मेडिकल अकॅडमीतील उज्ज्वल यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा लवकरच मान्यवरांच्या हस्ते भव्य कार्यक्रमात गौरव करण्यात येणार असल्याची माहिती अकॅडमीचे संचालक सुभीत यादव यांनी दिली.

# इथले भय संपत नाही....! बिबट्या पाडतोय पाळीव कुत्र्यांचा फडशा

**चरेगाव/प्रतिनिधी:**

कळंत्रेवाडी,ता.कराड परिसरात वावरणाऱ्या बिबट्याकडून पाळीव कुत्र्यांचे फडशा पाडण्याचे सत्र सुरूच असल्यामुळे इथले भय काही केल्या संपत नाही अशीच काहीशी परिस्थिती निर्माण झाली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, गत आठवड्यात गावचे उपसरपंच दिलीप यादव यांच्या पाळीव कुत्र्यावर हल्ला करून बिबट्याने धूम ठोकली होती. ही घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली होती.



दरम्यान, ही घटना ताजीच असताना शनिवार दिनांक २० जून पासून जगन्नाथ थोरात यांचे पाळीव कुत्रे गायब झाले असल्यामुळे त्याला बिबट्याने तर ठार केले नाही ना? अशी चर्चा गावामध्ये सुरू असून कळंत्रेवाडी परिसरातील बिबट्याच्या सततच्या वावरामुळे तशी शंका घेण्यास वाव आहे. जगन्नाथ थोरात यांचे पाळीव कुत्रे खूप कडक होते. त्यामुळे संपूर्ण गल्लीची चांगल्या पद्धतीने राखण करण्याचे काम केले जात होते. गल्लीतील नागरिकांना चोरांचे अथवा इतर गोष्टींचे भय वाटत नव्हते. परंतु,या परिसरातील अलीकडील काळात वाढलेला बिबट्याचा वावर, गत आठवड्यात उपसरपंच दिलीप यादव यांच्या कुत्र्यावर हल्ला करीत ठार करून बिबट्याने ठोकलेली धूम आणि जगन्नाथ थोरात यांचे पाळीव कुत्रे अचानकपणे गायब होणे.

या गोष्टी कळंत्रेवाडी परिसरात बिबट्याचा वावर असल्याचे सिद्ध करतात. त्यामुळे येथील नागरिक भयभीत झाले असून एखाद्या पाळीव पशुधनावर, लहान लहान वासरे, रेडके,कोकरे, शेळ्यांवर भविष्यात बिबट्याने हल्ला केला तर मोठे आर्थिक नुकसान संभवण्याचा धोका नाकारता येत नसल्यामुळे शेतकरी वर्ग चिंताग्रस्त आहे. त्यामुळे येथील बिबट्याचा वावर कधी संपणार? कळंत्रेवाडी परिसर भयमुक्त कधी होणार? हे सांगता येणे कठीण असून यासाठी वाट पहावी लागणार आहे हेच खरे..!